भारतीय रिज़र्व बैंक
**RESERVE BANK OF INDIA**
www.rbi.org.in

***आरबीआय/२०१२-१३/१०१***

*डीजीबीए.जीएडी.क्र. एच-३/४२.०१.०३४/२०१२-१३* *जुलै २, २०१२*

*प्रति,*

*सर्व एजन्सी बँका,*

*माननीय महोदय/महोदया,*

***महापरिपत्रक - प्रत्यक्ष कर संकलन - ओएलटीएएस***

*कृपया या विषयावरील अस्तित्वातील सर्व सूचनांचा एकाच जागी पटकन संदर्भ घेणे शक्य व्हावे या हेतूने निर्गमित केलेल्या आमच्या या विषयावरील परिपत्रक क्र. आरबीआय/२०११-१२/९९ दिनांक ०१ जुलै, २०११ चा संदर्भ घ्यावा. आम्ही जून २०१२ पर्यंत दिलेल्या महत्वाच्या सूचना समाविष्ट करुन, हे परिपत्रक अद्यावत केले आहे. हे परिपत्रक आमच्या* www.mastercirculars.rbi.org.in *या वेबसाइटवरूनहि डाऊनलोड करता येईल.*

*२. कृपया पोच द्यावी.*

*आपला विश्वासू*

*(बी. के. मिश्रा)*
*महाव्यवस्थापक*

*जोडपत्र : पुढीलप्रमाणे*



*शासकीय व बँक लेखा विभाग मुख्य कार्यालय, मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन समोर, भायखळा, मुंबई: ४०० ००८*
*टेलिफोन : (०२२)२३०८ ४१२१, फॅक्स नं. (०२२) २३००० ३७०/२३०१ ६०७२/२३०१ ००९५, ई.मेल :* cgmicdgbaco@rbi.org.in

## *प्रत्यक्ष कर गोळा करण्यावर महापरिपत्रक*

### *परिचय*

*सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस (सीबीडीटी) हे देशातील वेगवेगळ्या भागात असलेल्या आयकर आयुक्तांच्या द्वारे विविध प्रत्यक्ष करांच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार आहेत. आयकर अधिनियम, १९६१ आधीन आयकर आयुक्तांवर आयकर आणि निगम कर वगैरे गोळा करण्याची तसेच परत करण्याची जबाबदारी सोपविलेली आहे.*

*२. प्रिंसिपल चिफ कंट्रोलर ऑफ अकाऊंटस (पीआर.सीसीए) ही सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस च्या लेखा संघटनेचे महाप्राधिकरण आहे. विभागवार रचनेनुसार, पीआर.सीसीए, सीबीडीटी यांना प्रत्यक्ष करासंबंधातील सर्व प्राप्ती आणि परतावे यांच्या लेखाच्या संबंधातील सर्व कार्ये नेमून देण्यात आली आहेत. पीआरसीसीए नवी दिल्लीत बसतात आणि संपूर्ण देशातील झोनल अकाऊंटस ऑफिसेस(झेडएओज) च्या माध्यमातून प्रचालन करतात. आजच्या स्थितीला विविध ठिकाणी स्थित असलेली २४ झेडएओ आहेत.*

### *३. लेखेची मुख्य शीर्षके*

*आयकर विभागातर्फे गोळा करण्यात येणारे विविध प्रकारचे कर पुढील मुख्य शीर्षकांखाली वर्गीकृत केलेले आहेतः*

| | |
|---|---|
| *१) निगम कर (सी.टी)* | *००२० निगम कर* |
| *२) आयकर (आय.टी.)* | *००२१ निगम कराव्यतिरिक्त उत्पन्नावरील कर* |
| *३) संपत्ती कर (डब्ल्यू.टी.)* | *००३२ संपत्तीवरील कर* |
| *४) देणगी कर (जी.टी)* | *००३३ देणगीवरील कर* |

*(या विषयातील पुढिल स्पष्टिकरणासाठी , आवश्यक असल्यास, बँका* www.taxmann.com *या संकेतस्थळाचा संदर्भ घेऊ शकतात)*

*४. १ एप्रिल १९७६ पूर्वी, आयकर आणि अन्य प्रत्यक्ष कर भारतीय रिझर्व बँक (आरबीआय), भारतीय स्टेट बँकेच्या शाखा(एसबीआय), सरकारी व्यवहार करणाऱ्या तिच्या सहयोगी संस्था, कोषागारे आणि उप-कोषागारे येथे स्वीकारले जात असत. हे कर जनतेला सोयीस्कररित्या जमा करता यावेत यासाठी ठिकाणे वाढविण्याच्या दृष्टीने, १ एप्रिल १९७६ पासून सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या शाखांच्या माध्यमातून आयकर आणि अन्य प्रत्यक्ष कर गोळा करण्याची योजना सुरू करण्यात आली.*

### *५. 'प्रत्यक्ष करांसाठी लेखा पध्दती' - सुधारित कार्यपद्धती*

***(आरबीआय परिपत्रक डीजीबीए.जीडीए. क्र. एच-६८४/४२.०१.००१/२००३-०४ दिनांक जानेवारी ९, २००४)***

*लेखांकन आणि अहवाल देणे, वित्तप्रेषणातील आणि कागदपत्रे रवाना करण्यातील दिरंगाई वगैरेशी संबंधित विषयांचा अभ्यास केल्यानंतर 'सरकारी लेखावरील कार्यकारी गटा' ने सुधारित कार्यपद्धतीची शिफारस केली जी १ ऑक्टोबर १९८८ पासून अंमलात आली. रिझर्व बँकेने सीबीडीटी च्या देयांच्या स्वीकृतीसाठी आणि त्याच्या लेखांकन आणि अहवाल देण्यावरती आपल्या, 'प्रत्यक्ष करांसाठी लेखा पध्दती' या पिंक बुकलेट म्हणून जाणल्या जाणाऱ्या प्रकाशनाद्वारे सर्वसमावेशक सूचना निर्गमित केल्या आहेत.*

*६. प्रत्यक्ष करदात्यांना देण्यात येणाऱ्या ग्राहक सेवेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने, 'प्रत्यक्ष कर लेखांकन पध्दती'च्या पुढील तरतूदींकडे विशेष लक्ष वेधण्यात आले.*

***(आरबीआय/२००४/१३५ (डीजीबीए.जीएडी.क्र. ११४२/४२.०१.००१/२००३-०४) दिनांक एप्रिल २, २००४)***

*(१) **ओळखचिन्ह देणे** : रिझर्व बँकेची प्रदानाची पोचपावती म्हणून कागदी ओळखचिन्ह देण्याबाबत स्पष्ट सूचना असतानाहि, असे दिसून आले आहे कि, मोठ्या प्रमाणात अधिकृत शाखा अशी ओळखचिन्हे देत नाहीत. बऱ्याच ठिकाणी, काहीतरी अनौपचारिक व्यवस्था असते ज्यामध्ये करदात्याला एखाद्या विशिष्ट तारखेनंतर बँक शाखेतून चलान घेऊन जाण्यास सांगितले जाते. काही प्रकरणात पोचप्राप्तीची चलाने सुरक्षितपणे न ठेवता एक उघड्या पेटीत ठेवण्यात येतात. ग्राहकांना कोणतीहि ओळख पटविल्याशिवाय मुक्तपणे चलान उचलण्याची मुभा असते. धनादेश किंवा धनप्रेष जोडून चलन जमा केले असता, धनादेश किंवा धनप्रेषाची रक्कम वसूल झाल्यानंतरच पोचप्राप्तीची चलाने निर्गमित केली जातात आणि त्यामुळे कागदी ओळखचिन्हावर ज्या तारखेला पोंचप्राप्ती चलाने तयार ठेवली जातील त्याचा निर्देश असावा म्हणजे निर्धारिती ओळखचिन्हावर दिलेल्या तारखेला पोचप्राप्ती चलान ताब्यात घेण्याची व्यवस्था करावी.*

*(२) **प्राप्ती चलन** : स्थानिक क्लियरिंग व्यवस्थेच्या आधारे, निर्धारितीला पोंचप्राप्ती चलान ४-५ दिवसात उपलब्ध करून दिले पाहिजे. ठरवून दिलेला प्रतीक्षा कालावधी वाढणार नाही याची शाखांनी खात्री केली पाहिजे आणि या बाबतीतील उल्लंघनाकडे रिझर्व बँक गंभीरपणे पाहील. निर्धारितीने संबंधित कागदी ओळखचिन्ह सादर केल्यावर खिडकीतून ते त्याला सुपूर्द करीपर्यंत पोचप्राप्ती चलान काळजीपूर्वक आणि सुरक्षितपणे हाताळले पाहिजे. कोणत्याहि परिस्थितीत, ग्राहक पोचू शकतील अशा उघड्या पेटीत पोचप्राप्ती चलाने ठेवू नयेत.*

*(३) **पोचप्राप्ती चलानांवर दोन तारखांचे शिक्के :** येथे पुनरुच्चार केला जात आहे कि, चलानवर दोन तारखांचे शिक्के असावेत म्हणजे पिंक बुकलेटच्या परिशिष्ट -५ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे चलान आणि साधन 'सादर केल्याची तारीख' आणि साधनाचे उत्पन्न 'वसूल झाल्याची तारीख'.*

*(४) **क्लियरिंगसाठी धनादेशांची स्वीकृती :** असे निदर्शनास आले आहे कि, बँका कर स्वीकारताना अन्य बँकेवर दिलेले धनादेश स्वीकारायला नाखुष असतात, परिणामी चार्टर्ड अकाऊंटंट/ कर सल्लागार त्यांच्या ग्राहाकांच्या वतीने स्वतःचे धनादेश सादर करतात. अन्य बँकांवर दिलेले धनादेश स्वीकारणे ग्राहकांना सोयीचे होईल म्हणून बँकाना असा सल्ला देण्यात येत आहे कि, अन्य बँकेवर दिलेल्या धनादेशासह चलान सादर करणाऱ्या ग्राहकांना परत पाठवू नये.*

*(५) **काय करावे आणि काय करू नये.** : पिंक बुकलेटच्या परिशिष्ट-४मध्ये दिलेली, काय करावे आणि काय करू नये याची सूची आवश्यकता असल्याप्रमाणे प्रत्यक्ष कर गोळा करण्याच्या कामाशी संबंधित बँक कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली नाही. ही सूची शाखांना देण्यात यावी.*

## *७. <u>ऑनलाइन टॅक्स अकाउंटिंग सिस्टिम (ओएलटीएएस)</u>*

***(आरबीआय/२००४/१३१(डीजीबीए.जीएडी.क्र.१००८/४२.०१.०३४/२००३-०४)दिनांक एप्रिल १, २००४, आरबीआय/१४५/२००४/(डिजीबीए.जीएडी.क्र. एच-१०६८/४२.०१.०३४/२००३-०४) दिनांक एप्रिल १६, २००४ आणि आरबीआय/१८४(डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१११४/४२.०१.०३४/२००३-०४) दिनांक एप्रिल २९, २००४)***

*__७.१__ भारतीय रिझर्व बँकेने जानेवारी २००३ मध्ये ओएलटीएसच्या स्थापनेसाठी एक उच्चाधिकार समिती(एचपीसी)गठित केली होती. उच्चाधिकार समितीने ऑनलाइन टॅक्स लेखांकन पध्दतीसाठी लेखांकनाची कार्यपद्धती सुचविण्यासाठी एक उपसमिती नेमली. सीजीए आणि सीएजी यांनी यथोचित मंजूर केलेली लेखांकनाची कार्यपद्धती जून १, २००४ पासून प्रभावाने ओएलटीएससाठी सुरू करण्यात आली. नवीन लेखांकन कार्यपद्धती (परिशिष्ट) एप्रिल १६,२००४ रोजी सर्व एजन्सी बँकांना रवाना करण्यात आली. फाडून घेता येणाऱ्या स्थळप्रतीसह एकमात्र प्रतीतील चलान, एकमात्र चलान आणि करदात्याच्या स्थळप्रतीवर चलान ओळख क्रमांक (सीआयएन) म्हणून ओळखला जाणारा अनन्य अनुक्रमांकाचा स्वीकृती शिक्का उमटविणे, ही नवीन लेखांकन पध्दतीची ठळक वैशिष्ट्ये आहेत. आता करदात्यांना त्यांनी प्रदान केलेला कर <u>http://tin-nsdl.com</u> लॉग करून पाहता येणे शक्य आहे. त्याशिवाय आयकर विभागाला पाहिजे असलेल्या नवीन फाईलची रचनाहि एजन्सी बँकाना, त्यांना ओएलटीएससाठी योग्य ते सॉफ्टवेअर विकसित करण्यासाठी रवाना करण्यात आली होती.*

*७.२ नवीन कार्यपद्धती आधीन बँकाना, क्लियरिंगच्या धनादेशासह/धनप्रेषासह (म्हणजे रोख आणि धनादेश/धनप्रेष हस्तांतराव्यतिरिक्त) सादर केलेल्या चलानसाठी, अशा धनादेशाची/धनप्रेषाची रक्कम वसूल झाल्यानंतरच स्वीकृती पोच निर्गमित करण्याचा सल्ला देण्यात आला होता. अशा चलानसाठी चलान सादर करण्याची तारीख आणि ज्या तारखेला स्थळप्रत देण्यासाठी तयार ठेवण्यात येईल ती तारीख दर्शविणारे कागदी ओळखचिन्ह देण्याचा सल्लाहि बँकाना देण्यात आला होता. प्राप्तकर्त्या बँकरला अशा धनादेशांची/धनप्रेषांची रक्कम वसूल झाल्यानंतर करदात्याच्या स्थळप्रतीचा फाडून घेण्याचा भाग त्यावर खालील बाबींचा समावेश असलेल्या चलान ओळख क्रमांक (सीआयएन) सह प्राप्तीची पोंचपावती देणारा रबरी शिक्का उमटवून परत करण्याचा सल्ला देण्यात आला होता.*

*अ) बँक शाखेचा बीएसआर सांकेतिक क्रमांक (७ अंकी)*
*ब) चलान सादर केल्याची तारीख (तारीख/महिना/वर्ष )*
*क) त्या शाखेतील त्या दिवशीच्या चलानचा अनुक्रमांक (५ अंकी)*

*७.३ रोख किंवा त्याच प्राप्तकर्त्या शाखेवर काढलेला धनादेश जोडलेल्या चलानाचा फाडून देण्याचा भाग करदात्याला त्याच दिवशी उक्त विहित रबरी शिक्का उमटवून योग्य पोचपावतीसह परत द्यावा.*

*७.४ सर्व नॉन-कॉम्प्युटराइजड/नॉन-नेटवर्क्ड शाखांना असा सल्ला देण्यात आला होता कि, त्या शाखांशी संबंधित माहिती त्यांच्या नजीकच्या कॉम्प्युटराइजड/नेटवर्कड शाखेतून नोडल शाखेकडे आणि नोडल शाखेकडून जोडकक्षाकडे पारेषित करण्यात यावी जेणे करून एका बँकेच्या भारतातील सर्व प्राधिकृत शाखांच्या संबंधातील संपूर्ण माहिती कोणत्याहि जोडणीविना एनएसडीएलने संचलित केलेल्या टॅक्स इन्फर्मेशन नेटवर्क (टीआयएन) कडे पारेषित होईल याची खात्री करावी.*

*७.५ त्यापुढे असाहि सल्ला देण्यात आला होता कि, संबंधित आयकर विभागाकडे लेखपट्टिका(स्क्रोल) आणि चलान पाठविण्याच्या बाबतीत तरी विद्यमान कार्यपद्धतीची जागा ओएलटीएस आधीन नवीन लेखांकन पध्दती घेईल. असाहि सल्ला देण्यात आला होता कि, बँकांकडे रवाना केलेल्या ओएलटीएस लेखांकन कार्यपद्धतीत प्रस्तावित बदलांव्यतिरिक्त, पिंक बुकलेट 'प्रत्यक्ष करांसाठी लेखांकन पध्दती' मध्ये समाविष्ट असलेल्या सूचना (जून ३०, १९९९ पर्यंत अद्यतन केलेल्या) लागू राहतील.*

*७.६ त्यापुढे, झेडएओ आणि आयकर विभागाकडे लेखपट्टिका आणि चलान पाठविण्याच्या नेहमीच्या पध्दतीव्यतिरिक्त टीआयएन कडे पेनलाइन माहिती पारेषित करण्याच्या आवश्यकतेवर सुध्दा भर देण्यात आला होता.*

*७.७ बँकाना असे सुचविण्यात आले होते कि, द्विमार्गी सुरक्षित संवादाची खात्री करण्यासाठी त्यांनी आपले नागपूर येथील जोड कक्ष मुंबई येथील टीआयएन (एनएसडीएल) शी समर्पित लिजड लाइनने जोडावेत.*

## *८. एनएसडीएल कडे माहितीचे पारेषण - वैधता तपासण्या*

***(आरबीआय/२००४/७५ (डीजीबीए.जीएडी.क्र.एच-६९/४२.०१.०३४/२००४-०५) दिनांक जुलै २८, २००४, डिजीबीए.जीएडी.क्र. एच-८६४९/४२.०१.०३४/२००५-०६ दिनांक डिसेंबर २३, २००५)***

*८.१ बँकानी अपलोड केलेल्या माहितीतील नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लि.(एनएसडीएल)/आयकर विभागाने नोंद घेतलेल्या विविध चुका बँकाना कळविण्यात आल्या आहेत. विशेषतः पॅन/टॅन क्रमांक, चुकीची नोडल लेखपट्टिका शाखा माहिती, निर्धारण वर्ष, करदात्याचे नाव चुकीचे असणे किंवा नसणे, सीआयएन क्र., मुख्य शीर्षक संकेत आणि रक्कम या बाबतीतील चुका बँकांच्या नजरेला आणून देण्यात आल्या.*

*८.२ नजरेला आलेल्या उणिवांवर उपाय म्हणून, असे ठरविण्यात आले आहे कि, प्रत्येक बँक सर्व रेकॉर्ड टाईपसाठी ओएलटीएस सॉफ्टवेअरमध्ये तातडीच्या प्रभावाने पुढील वैधता तपासण्या अंतर्भूत करील.*

1. *आरटी०१ आणि आरटी०६ मधील अनुक्रमे एनओडी-बीआर-सीओएल-एससी-डीटी आणि एनओडी-बीआर-पीवायएमटी-एससी-डीटी क्षेत्रासाठी मूल्य ०१-०६-०४ ते पारेषणाच्या तारीख(म्हणजे फाईलचे नाव) या मधील असावे.*

२. पॅन/टॅन क्रमांक १० वर्णसंख्यात्म चिन्हांपेक्षा कमी असू शकत नाही. त्यांची लांबी १० असेल तर पॅन च्या बाबतीत पॅनची पहिली पाच आणि दहावे चिन्ह केवळ वर्ण असावे आणि सहाव्यापासून नवव्यापर्यंत म्हणजे पुढची चार केवळ संख्यात्म असावीत. टॅनच्या बाबतीत पहिली तीन चिन्हे सीटीयु संकेत आणि चौथे, दहावे वर्ण असले पहिजे आणि पुढची पाच (पाचव्यापासून नवव्यापर्यंत) संख्यात्म असावीत. पॅन/टॅन अवैध असेल तर नाव आणि पत्ता अनिवार्यपणे धरण्यात यावा. (जानेवारी १, २००५ पासून पॅन/टॅन नमूद करणे सक्तीचे करण्यात आले आहे)

३. नावाचे क्षेत्र हे नेहमीच बंधनकारक असते आणि त्यात केवळ वर्णसंख्यात्म आणि बिंदुंचा संयोग असावा आणि ते एक चिन्हापेक्षा मोठे असावे. (नावाचे स्ट्रींग बिंदू आणि संख्यात्म किंवा दोन्हीचे नसावे. मुख्य स्ट्रींगमध्ये अक्षरे असावेत) चलानमध्ये पॅन/टॅन नमूद केल्याच्या वस्तुस्थिती उपरांतहि करदात्याचे पूर्ण नाव पारेषित करणे बंधनकारक आहे.

४. गोळा करणाऱ्या शाखेचा झेडएओ सांकेतिक क्रमांक कायम असतो आणि झेडएओ सांकेतिक क्रमांक रिझर्व बँकेने प्रकाशित केलेल्या पिंक बुकलेटमध्ये उपलब्ध आहेत. नोडल शाखांनी हे झेडएओ सांकेतिक क्रमांक रेकॉर्ड टाईप ०१ मध्ये अचूक नमूद केले जातील आणि कोणत्याहि परिस्थितीत बदलले जाणार नाहीत याची खात्री केली पाहिजे. असे सुचविले जात आहे कि, बँकानी त्यांच्या ओएलटीएएस सॉफ्टवेअरमध्ये झेडएओ क्षेत्रात सांकेतिक क्रमांक सुरक्षित ठेवावेत कारण एकाच शाखेने पारेषणाच्या वेगवेगळ्या तारखांना वेगवेगळे झेडएओ सांकेतिक क्रमांक नमूद केल्याच्या घटना आरबीआय/सरकारच्या नजरेला आल्या आहेत.

**८.३** उक्त वैधता तपासण्यांव्यतिरिक्त बँकानी पुढील पर्यवेक्षकीय पावलेहि उचलायची आहेत. :-

१. गोळा करणाऱ्या शाखेच्या शाखा व्यवस्थापकाने चलान मधून पकडलेले नाव आणि रक्कम बरोबर आहेत याची खात्री केली पाहिजे. त्यासाठी डेटा एन्ट्रीची 'मेकर-चेकर' पध्दत सर्व बँक शाखांनी स्वीकारली पाहिजे.

२. सर्व गोळा करणाऱ्या शाखांनी त्या दिवशी जर काही जमा झाली असेल तर, रेकॉर्ड टाईप ०१ आणि रेकॉर्ड टाईप ०२ (समरी रेकॉर्ड ) सक्तीने पारेषित केले पाहिजे ज्या शाखांत त्या दिवशी काहीच जमा झालेली नसेल त्यांनी केवळ रेकॉर्ड टाईप ०२ नोडल शाखेकडे पारेषित केले पाहिजे. यामुळे टीआयएनला ओएलटीएएस वर अचूक लक्ष ठेवणे शक्य होईल.

३. नोडल शाखेच्या पातळीवर सर्व गोळा करणाऱ्या शाखा रेकॉर्ड टाईप ०१ आणि रेकॉर्ड टाईप ०२ पारेषित करीत आहेत याची खात्री करण्यासाठी पर्यवेक्षण केले पाहिजे. ज्या गोळा करणाऱ्या शाखांत काहीच जमा झालेली नाही त्या एमएजे-एचडी-सीडी=० आणि टीओटी-एएमटी=० सह केवळ रेकॉर्ड टाइप ०२ (निरंक विवरणपत्र) त्यांच्या संबंधित नोडल शाखेकडे पारेषित करीत आहेत याचीही त्यांनी खात्री केली पाहिजे.

४. नोडल शाखेच्या व्यवस्थापकाने झेडएओला विशिष्ट तारखेला सादर केलेल्या नोडल शाखा लेखपट्टिकेत दाखविलेली शीर्षकनिहाय जमेचा, टीआयएनला सादर करण्यासाठी जोडकक्षाकडे पारेषित केलेल्या ओएलटीएस डेटातील तदनुरूप एकुणातबरोबर ताळा होतो आहे याची खात्री करून घेतली पाहिजे. हा प्रयोग जून १, २००४ पासूनच्या सर्व प्रदानांबाबत केला पाहिजे.

५. जोडकक्ष पातळीवरील सर्व बँकानी टीआयएनला पारेषित केलेल्या चुकीच्या नोंदीबाबत कृती केल्याचे एरर रेकॉर्ड ठेवले पाहिजे. यामुळे टीआयएनने काही उणीवांमुळे आरंभी फेटाळलेल्या सर्व नोंदी ४८ तासांच्या आत त्या उणीवा दूर केल्यानंतर टीआयएनकडे पुनर्परिषित केल्या जातील.

६. असे निदर्शनास आले आहे कि, बँका चुकीच्या मेजर हेड संकेतांची नोंद करीत आहेत म्हणजे मेजर हेड ०२० खाली निगम कराप्रती किंवा मेजर हेड०२१ खाली निगम कराव्यतिरिक्त आयकराप्रती प्राप्त झालेले प्रदान यांची अदलाबदल करून. त्यामुळे टाळता येईल असे प्रदानाचे चुकीचे वर्गीकरण होते आणि त्याचा परिणाम आयकर विभाग आणि झेडएओ यांच्यातील लेखाच्या मेळ घालण्यावर होतो. वैध पॅन च्या बाबतीत, उक्त वैधता ओएलटीएएस

*सॉफ्ट्वेअरमध्ये अंमलात आणता येईल म्हणजे ४ थे चिन्ह (डावीकडून) जर 'सी' असेल तर मेजर हेड ०२० असले पाहिजे.*

***८.४*** *आयकर विभागाने आम्हाला असेहि कळविले आहे कि, निर्धारण वर्षाची माहिती पारेषित करताना, बँकानी सामान्य तसेच ब्लॉक निर्धारण वर्षासाठी पहिला भाग पारेषित करणे आवश्यक आहेः उदा.ः सामान्य निर्धारण वर्ष २००५-०६ साठी बँकेने २००५ सुध्दा पारेषित केले पाहिजे आणि १९९७-२००५ सारख्या ब्लॉक निर्धारण वर्षासाठी १९९७ पारेषित करावे.*

## ***९. झेडएओना रोज लेखपट्टिका(स्क्रोल्स) इ-मेलने पाठविणे***

***(आरबीआय/२००६/२९५(डीजीबीए.जीएडी.क्र. एच-११९४०/४२.०१.०३४/२००५-०६ दिनांक फेब्रुवारी २, २००६)***

*बँकांना प्रत्यक्ष कर गोळा करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक नोडल ब्रँच डेलि स्क्रॉल  च्या सुधारित नमुन्याबद्दल कळविण्यात आले होते. प्रत्यक्ष चलानची/लेखपट्टिकेची प्राप्ती प्रलंबित असताना जमा करणाऱ्या सर्व बँकानी झेडएओना इलेक्ट्रॉनिकद्वारा नित्य मुख्य लेखपट्टिका पाठविण्यासाठी सुधारित नमुन्याचा* ***(परिशिष्ट ३)*** *चा उपयोग करायचा आहे.*

## ***१०. सीबीडीटीच्या देय रकमा (ड्युज)जमा करण्यासाठी सबएजन्सी नष्ट करणे- ओएलटीएएस***

*(आरबीआय/२००४/३२६(डीजीबीए.जीएडी.क्र.३२७८-३३११/४२.०१.०३४(२००४-०५) दिनांक डिसेंबर ३१, २००४)*

*असे निदर्शनास आले आहे कि, ओएलटीएएस खाली माहिती अपलोड न करण्याचे मुख्य कारण जेथे संबंधित सबएजन्सी बँकेकडे सीबीडीटीने त्यावेळी विहित केलेल्या अटीनुसार स्वतःची नोडल शाखा असण्यासाठी पुरेशा संख्येत शाखा नसल्यामुळे अशा ठिकाणी अन्य प्रमुख बँकेबरोबर अस्तित्वात असलेली सबएजन्सीची व्यवस्था हे आहे. मिळतेजुळते नसल्यामुळे वा अन्य कारणाने, सबएजन्सी व्यवस्थेखाली गोळा करणाऱ्या बँकांना प्राप्त झालेली माहिती अनेक प्रकरणी प्रमुख एजन्सी बँकेकडून टीआयएनकडे अपलोड केली जात नव्हती. सबएजन्सी व्यवस्थेतून निर्माण होणारी दिरंगाई आणि समस्या टाळण्याच्या दृष्टीने आयकर संचालनालय (पध्दती) नवी दिल्ली यांच्या बरोबर समंत्रणा केल्यानंतर असे ठरविण्यात आले आहे कि, सबएजन्सी व्यवस्था संपूर्णपणे खंडित करण्यात यावी. बँकाना कळविण्यात आले होते कि, सबएजन्सी व्यवस्थेखाली जेथे जेथे त्यांच्या शाखा कार्यरत होत्या तेथे त्याची स्वतःची नोडल शाखा निर्धारित करावी.*

## ***११. निधीचा समझोता - आरबीआय, सीएएस नागपूर यांना कळविणे.***

***(आरबीआय/२००५/४६६ (डीजीबीए.जीएडी.क्र.५८०१/४२.०१.०३४/२००४-०५) दिनांक मे १३, २००५ आरबीआय.२००५/४०६(डीजीबीए.जीएडी.एच ५२३६/४२.०१.०३४/२००४-०५)दिनांक मार्च २९,२००५)***

***११.१*** *एप्रिल १, २००५ पासून प्रभावाने टीआयएन कडे अपलोड केलेल्या ऑनलाइन डेटाच्या आधारे निधीचा समझोता करण्याचा निर्णय लक्षात घेऊन आरबीआय, सीएएस नागपूर यांच्याकडे सीबीडिटी व्यवहार कळविण्याच्या विद्यमान पद्धतीचे पुनरावलोकन केले होते. त्यानुसार, असे ठरविण्यात आले होते कि. एजन्सी बँका अंकीय सहीनिशी इमेल द्वारा (इमेलवर वर्ग २ प्रमाणपत्र धारकाने सही करावयाची आहे) स्वतंत्रपणे आरबीआय, सीएएस, नागपूर यांना सीबीडीटी आकडे सादर करतील. सप्ताहातील दिवशी १३.१५ वाजता असल्याप्रमाणे आणि शनिवारी दुपारी १२.३० वाजता असल्याप्रमाणे टीआयएनकडे कळविलेले सीबीडीटी आंकडे त्याच वेळी सीएएस, नागपूरकडे अंकीय सहीनिशी इ-मेल द्वारा निधीच्या  समझोत्यासाठी कळविले जातील. शेवटच्या वेळेनंतर मेल केलेला डेटा सीएएस, नागपूर कोणत्याहि परिस्थितीत स्वीकारणार नाही.*

***११.२*** *बँकांना असे कळविण्यात आले होते कि, आरबीआय, सीएएस येथील यंत्रणेने फेटाळलेले काहीहि त्याच दिवशी हिशोबात धरले जाणार नाही कारण सध्या ते फक्त जोड कक्षाकडून दुरुस्त केलेले सुधारित ॲडव्हाइस प्राप्त केल्यानंतरच केले जात आहे. केवळ सीएएस येथील यंत्रणेने स्वीकारलेले आकडेच हिशोबात धरले जातील. फेटाळण्याचा अहवाल त्याच दिवशी दैनिक इनपुट विवरणपत्रासमवेत जोड कक्षाकडे पाठविला जाईल. या बाबतीत बँकानी त्यांच्या शाखाना आणि जोड कक्षांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.*

***११.३ हे स्पष्ट करण्यात आले होते कि, कोणत्याहि विशिष्ट तारखेला निधी समझोत्यासाठी सीएएस, नागपूर यांच्याकडे अपलोड केलेली आर्थिक डेटा फाईल आणि त्या विशिष्ट समझोता तारखेशी संबंधित टीआयएनकडे अपलोड केलेला चलान डेटा तंतोतंत जुळले पाहिजेत.*** *वैधतेतील चुकीमुळे वगैरे एनएसडीएलने फेटाळलेल्या फाइल्स, काही असल्यास, त्यावर स्वतंत्रपणे संस्करण करून पुन्हा अपलोड कराव्यात. बँकाना असे कळविण्यात आले होते कि, निर्धारितीने जमा केलेल्या प्रत्येक चलानाच्या बाबतीतील डेटा टीआयएनकडे योग्य प्रकारे अपलोड केला जाईल आणि स्वीकारला जाईल याची खात्री करावी. टीआयएनकडे अशा पुन्हा अपलोड केलेल्या डेटामुळे निधी समझोता डेटावर काही परिणाम होणार नाही. जोडकक्षाकडून सीएएस, नागपूर कडे जाणारा डेटा आणि टीआयएनकडे जाणारा संबंधित चलान डेटा एकाच वेळी अपलोड केल्यास टीआयएनला संपूर्ण अहवाल देण्याच्या गरजेची पूर्तता होऊ शकेल.*

***११.४*** *जोडकक्षांना याची खात्री करून घेण्यास सांगण्यात आले होते कि, सीएएस, नागपूर आणि टीआयएन कडे विशिष्ट तारखेसाठी अपलोड केलेल्या डेटात फरक असणार नाही.*

***११.५*** *नोडल शाखांना कळविण्यात आले होते कि, 'अकाउंटिंग प्रोसिजर रिलटिंग टु ऑनलाइन टॅक्स अकाउंटिंग सिस्टीम' (ओएलटीएएस) च्या परिच्छेद ६ मध्ये समाविष्ट असलेल्या सूचनांचे काटेकोरपणे अनुसरण करावे आणि असे कळविण्यात आले होते कि, संबंधित विभागीय लेखा कार्यालयाकडे रोजच्या रोज लेखपट्टिका आणि चलान वगैरे रवाना करण्यात यावे.*

## ***१२. ओएलटीएएस संबंधात बँकाना मार्गदर्शन म्हणून आरबीआयने निर्गमित केलेल्या काही स्पष्टीकरणांचा खाली पुनरुल्लेख केला आहे. :-***

***(आरबीआय/२१३/२००४(डीजीबीए.जीएडी.क्र.एच-११६९/४२.०१.०३४/२००३-०४) दिनांक मे २२, २००४ आणि आरबीआय/२१३/२००४/१८१ (डीजीबीए.जीएडी.क्र.एच-२३५/४२.०१.०३४/२००३-०४) दिनांक सप्टेंबर १५, २००४)***

### ***१२.१ चलान ओळख क्रमांक (सीआयएन)***

*ओएलटीएएस अकउंटिंग प्रोसीजर (परिशिष्ट) च्या परिच्छेद क्र. १.३.३ नुसार हे स्पष्ट करण्यात आले होते कि, एका विशिष्ट तारखेला सर्व प्रकारच्या प्रत्यक्ष करांसाठी रोख, हस्तांतरणीय धनादेश त्याचप्रमाणे क्लियरिंग धनादेशासहित सादर केलेल्या सर्व चलानसाठी धावता अनुक्रमांक दिला पाहिजे. जसा रोख आणि हस्तांतरणीय धनादेश (म्हणजे गोळा करणाऱ्या शाखेवर दिलेला) जोडलेल्या चलानचा फाडून देण्याचा भाग सादर केल्याची तारीख, बीएसआर संकेत आणि सीआयएन वगैरे दर्शविणारा विहित रबरी शिक्का उमटवून सादरकर्त्याला परत दिला पाहिजे, तसाच क्लियरिंग धनादेश (म्हणजे अन्य बँकेवर/शाखेवर दिलेला) जोडून सादर केलेल्या चलानचा असा भाग केवळ साधनाच्या वसूलीनंतरच परत दिला पाहिजे. प्राप्तकर्त्या बँक शाखेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने मूळ चलान तसेच चलानच्या फाडून देण्याच्या भागावरहि सही करणे आवश्यक होते.*

***१२.२*** *ओएलटीएएस बाबत वारंवार विचारण्यात येणाऱ्या (एफएक्यु) प्रश्नांसाठी बँकाना आयकर विभागाच्या* www.incometaxindia.gov.in *या वेबसाइटलाहि भेट देण्यास सांगण्यात आले होते*

***१३***. *त्यापुढे, बँकाना प्राधिकृत शाखांच्या संपूर्ण सहभागाची खात्री करून घेण्यास आणि जेथे कर गोळा केला गेला आहे त्या प्रत्येक शाखेद्वारा तेथे नोंद झालेले प्रत्येक चलान टीआयएनकडे पारेषित केले जात आहे याचीहि खात्री करून घेण्यास सांगण्यात आले होते. याचा पुनरुच्चार करण्यात आला होता कि, दिवसभरात काहीच कर गोळा झाला नसेल तर टीआयएनला ओएलटीएएस वर नीट लक्ष ठेवणे शक्य व्हावे यासाठी निरंक(निल) विवरणपत्रे (रेकॉर्ड टाईप ०२) नोडल शाखेकडे पारेषित करता येईल. यावरहि भर देण्यात आला होता कि, टीआयएनकडे पाठविण्यात येणारा डेटा अचूक आणी पूर्ण असावा आणि ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीनुरूप असावा.*

***१४.*** *आयकर संचलनालयाने आरबीआयच्या नजरेला आणून दिलेल्या पुढील गंभीर उणीवाहि बँकाना कळविण्यात आल्या होत्याः*

***(आरबीआय/२००४/१६४ (डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१७०/४२.०१.०३४/२००३-०४) दिनांक सप्टेंबर ४, २००४)***

***१४.१ बँकानी पॅन/टॅन न पकडणे*** *- अनेक केंद्रातून असे दिसून आले आहे कि, करदात्याने त्याचा पॅन क्रमांक संपूर्ण नमूद केल्यानंतरहि, काही बँक शाखा तो नमूद करीत नाहीत किंवा अपुऱ्या पध्दतीने नमूद करतात या संबंधात बँकाना कळविण्यात आले होते कि, ऑनलाइन टॅक्स अकाउंटिंग सिस्टिम (ओएलटीएएस) कार्यपद्धतीत/नियमात, हे ठरवून देण्यात आले आहे कि, जेथे जेथे करदात्याने योग्य वर्णसंख्यात्मक रचनेतील १० अंकी पॅन/टॅन क्रमांक नमूद केला आहे, बँकानी केवळ पॅन आणि करदात्याचे नाव पकडायचे आहे आणि करदात्याचा पत्ता नव्हे.*

***१४.२ करदात्याचे पूर्ण नाव न पकडणे*** *- टीआयएनवर अपलोड केलेल्या डेटाचे अवलोकन केले असता निदर्शनास आले कि, अनेक बँक शाखा अजूनहि करदात्याच्या नावाच्या रकान्यात केवळ एक किंवा दोन चिन्हेच नोंदवतात. काही प्रकरणात तर केवळ चिन्हे आणि बिंदुंचा उपयोग करण्यात आला होता. बँकानी कृपया ओएलटीएएस डेटामध्ये करदात्याचे पूर्ण नाव पकडले जाईल याची खात्री करावी.*

***१४.३ पत्त्याच्या ठिकाणी चुकीची नोंद*** *- विश्लेषित डेट्यातून असेहि उघडकीला आले कि, अनेक बँक शाखा पत्त्याचे क्षेत्र योग्य प्रकारे पकडत नाहीत. अनेक बाबतीत, केवळ काही सरसकट वर्ण किंवा आकडे नोंदलेले होते जे पुन्हा हेच दर्शवितात कि, बँक शाखा पूर्ण डेटा पकडण्यासाठी पुरेशी काळजी घेत नाहीत. बँकाना योग्य ती सुधारणा करणारी कृती करण्याससाठी कळविण्यात आले होते.*

***१४.४ चलान ओळख क्रमांक(सीआयएन) चुकीचा कळविणे*** *- असे निदर्शनास आले आहे कि, बँक शाखा करदात्याच्या स्थळप्रतिवर विशिष्ट चलान ओळख क्रमांक (सीआयएन) देतात पण पाठविलेल्या ओएलटीएएस डेटावर वेगळाच सीआयएन नोंदवितात. ओएलटीएएस च्या कार्यपद्धती/नियमानुसार, सीआयएन केवळ सादर करण्याच्या तारखेलाच देण्यात यावा. करदात्याच्या स्थळप्रतिवर तसेच चलानच्या मुख्य भागावर उमटवलेला सीआयएन क्रमांकच टीआयएनकडे पारेषित करण्यात यावा.*

***१४.५ असमान लेखपट्टिका डेटा*** *- ऑनलाइन टॅक्स अकाउंटिंग कार्यपद्धती नियमांप्रमाणे, एका नोडल शाखेची एका विशिष्ट दिवसासाठीची लेखपट्टिका झेडएओ तसेच टीआयएनकडे ओएलटीएएस बाबत पारेषित केलेला डेटा अशा दोन्हीबरोबर जुळणारी असावी. हे स्पष्ट करण्यात आले होते कि, झेडएओ आणि टीआयएनकडे विशिष्ट दिवसासाठी पाठविण्यात येणारा जमा रकमेचा डेटा, चलानांची संख्या आणि मुख्य शीर्षक यांच्या संबंधात जुळला पहिजे. त्यापुढे बँकाना असेहि कळविण्यात आले होते कि, जेथे जमा केली जाते ती प्रत्येक शाखा प्रत्येक चलानची नोंद टीआयएनकडे पाठवीत आहे याची खात्री करावी.*

***१५. प्रत्यक्ष कर जमा करण्यासाठी बँक शाखांचा अधिकार काढून घेणे.***

***(आरबीआय/२००५/४१२ (डिजीबीए.जीएडी.क्र. ५३१८/४२.०१.०३४/२००४-०५) दिनांक एप्रिल ४, २००५)***

***१५.१*** *प्राधिकृत बँक शाखा सूचीतून काढण्याच्या कार्यपद्धतीला निश्चित दिशा देण्यासाठी, प्रमुख लेखा नियंत्रकांच्या कार्यालय, (पीआर.सीसीए), सीबीडीटी, नवी दिल्ली यांच्याशी समंत्रणा केल्यानंतर असे ठरविण्यात आले आहे कि, शाखांचे अधिकार काढून घेण्याचा कोणताही प्रस्ताव एजन्सी बँकांच्या मुख्य कार्यालयांनी पुढील मापदंड/मार्गदर्शक तत्त्वे लक्षात घेऊन आरबीआय, मध्यवर्ती कार्यालयाकडे सादर करावेतः*

*१) विद्यमान शाखेत आधीच्या वर्षात (एप्रिल-मार्च) काहीच प्रत्यक्ष कर जमा झालेला नाही.*
*२) प्राधिकृत शाखेचा अधिकार काढून घेण्यास संबंधित बँकेच्या उच्च व्यवस्थापनाची मान्यता आहे.*

***१५.२*** *आरबीआय/ पीआर.सीसीए, सीबीडीटी च्या कार्यालयाने प्रस्ताव स्वीकारल्यानंतर संबंधित बँकेने विशिष्ट शाखा विशिष्ट प्रस्तावीत तारखेपासून कर स्वीकारणे बंद करील याची मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धि करावी आणि आम्हाला त्याप्रमाणे कळवावे.*

***१६. कर माहिती जालाने विकसित केलेले फाइल वेगळ्या करण्याचे साधन***

***(आरबीआय/२००५/८१/(डीजीबीए.जीएडी.क्र. ३८२/४२.०१.०३४/२००५-०६) दिनांक जुलै २६, २००५)***

*१) काही बँकांकडून अशी विनंती प्राप्त झाली आहे कि, केवळ काही चुकीच्या नोंदींसाठी कर माहिती जालाने(टीआयएन) ने ओएलटीएएस डेटाची संपूर्ण फाईल फेटाळू नये. बँकांची अशी इच्छा आहे कि, टीआयएनने चुकीच्या नोंदी फेटाळताना योग्य प्रकारे वैध असलेल्या नोंदी स्वीकाराव्यात. एनएसडीएल(टीआयएन) बरोबर सीबीडीटी ने केलेल्या चर्चेच्या आधारे टीआयने फाइला वेगळ्या करण्याचे साधन विकसित केले आहे ज्याबाबत बँकाना कळविण्यात आले आहे. (परिशिष्ट२)*

### ***१७. सीबीडीटीची जमा रक्कम सरकारी खात्यात जमा करण्यासंबंधात कार्यपद्धती - सार्वजनिक क्षेत्रातील एजन्सी बँका***

***(आरबीआय/२००५/४११ (डीजीबीए.जीएडी.क्र. एच ५२८७/४२.०१.०३४/२००४-०५) दिनांक एप्रिल १, २००५, आरबीआय/२००६/१५०***
***(डीजीबीए.जीएडी.क्र. एच ६२२६/४२.०१.०११/२००६-०७दिनांक ऑक्टोबर १०, २००६ आरबीआय /२००७/२३५***
***(डीजीबीए.जीएडी.क्र. एच ११७६३ / ४२.०१.०११ /२००६-०७) दिनांक जानेवारी २४, २००७, आरबीआय /२००७/२८६***
***(डीजीबीए.जीएडी.क्र. १३७४२ / ४२.०१.०११ /२००६-०७) दिनांक मार्च १३, २००७)***

***१७.१*** *भारत सरकारशी सल्लामसलत केल्यानंतर असे ठरविण्यात आले आहे की, एप्रिल १, २००५ पासून, गोळा केलेला कर भरण्यासाठी परवानगी असलेल्या कमाल दिवसांच्या संख्येबाबतच्या सूचनांमध्ये सुधारणा करुन, ती टी अ ३ दिवसांच्या (रविवार व सुटीचे दिवस समाविष्ट) ऐवजी, टी अ ३ कामकाजाचे दिवस (जेथे टी हा, बँक शाखांना पैसे उपलब्ध झाल्याचा दिवस असेल) अशी करण्यात यावी. कामकाजाचे दिवस मोजण्यासाठी सीएएस नागपुर ह्यांची रजेच्या (सुटीच्या) दिवसांची यादी प्रमाणभूत धरली जाईल.*

***१७.२*** *असे ठरविण्यात आले आहे कि, पुट थ्रू तारीख म्हणजेच सीएएस, आरबीआय बरोबर तडजोड करण्याची तारीख या विद्यमान टी +३ कामकाजाच्या कालमर्यादेच्या बाहेर ठेवावी.*

***१७.३*** *बँकांवर विलंब कालावधी व्याज विलंब कालावधीसाठी लावावे आणि व्यवहाराच्या तारखेपासून नाही. दुसऱ्या शब्दात, 'विलंब कालावधी' चा हिशोब त्यापुढील पुट थ्रू तारखेपासून सुरू होईल.*

***१७.४*** *रु. १ लाख आणि त्यावरील व्यवहारातील विलंब कालावधीला विलंब कालावधी व्याज बँक दर + २% लागू होईल. बँक दर हा आरबीआयने वेळोवेळी अधिसूचित केलेला दर असेल.*

***१७.५*** *प्रत्येकी रु. १ लाखाच्या खालील व्यवहारासाठी, विलंब कालावधी व्याज बँक दराने केवळ ५ दिनदर्शिका दिवसांच्या विलंबासाठी लावले जाईल आणि ५ दिनदर्शिका दिवसांच्या वर* ***विलंबाच्या संपूर्ण कालावधीसाठी*** *बँक दर + २% दराने व्याज लावले जाईल. व्यवहाराच्या वेळी लागू असलेला आरबीआयने अधिसूचित केलेला दर हा बँक दर असेल.*

***१७.६*** *कंट्रोलर ऑफ जनरल अकाऊंटसद्वारा असेहि ठरविण्यात आले आहे कि मंत्रालये/विभागातील प्रत्येक प्रिंसीपल चीफ कंट्रोलर ऑफ अकाऊंटस (पीआरसीसीज), चीफ कंट्रोलर ऑफ अकाऊंटस (सीसीएज) आणि कंट्रोलर ऑफ अकाऊंटस (सीएज) नी बँकानी केलेल्या सर्व वित्तप्रेषणांचा त्रैमासिक आढावा घ्यावा. जर संपूर्ण बँकेत मिळून किंवा तिच्या कोणत्याहि शाखेत पाठोपाठच्या दोन तिमाहीत विलंब ५ % किंवा अधिक आढळला, संबंधित बँक किंवा शाखेसाठी अधिकृत दर्जा पीआरसीसीए/सीसीए/सीए च्या शिफारसींसह पुनरावलोकनासाठी सीजीएकडे पाठवावा. बँकानी त्यांची स्वतःची अंतर्गत नियंत्रण यंत्रणा उभारणे अपेक्षित आहे जेणेकरून, बँकेला तिच्या शाखांच्या बाबतीत प्रतिबंधक आणि दुरुस्तीच्या कारवाया वेळच्या वेळी करता येतील.*

### ***१८. सीबीडीटीच्या गोळा केलेल्या राशी सरकारी खात्यात जमा करण्याबाबत लेखा-कार्यरीत- खाजगी क्षेत्रातील प्रतिनिधि बँका***

***१८.१*** *खाजगी क्षेत्रातील प्रतिनिधी बँकांच्या बाबतीत, सीएएस नागपूर ह्यांच्याबरोबर व्यवहारांची तडजोड करण्याची कालसीमा ही* ***टी+३ दिवसांची (रविवार व रजा धरून)*** *असणे सुरू राहील. विलंबाचा काल हा, प्राप्तकर्ता बँक-शाखेमध्ये गोळा/ जमा झाल्याच्या तारखेपासून (बँकेत प्रत्यक्ष जमा होण्याच्या ) भारतीय रिझर्व्ह*

*बँक, सी ए एस नागपूर ह्यांना सरकारी खात्यात जमा करण्यासाठी कळविले जाईपर्यंतचा मोजला जाईल. विलंबकाला बद्दलचे व्याज त्या बँकांकडून, रक्कम कितीही असली तरी वसुलीयोग्य असेल. विलंब कालासाठी व्याज हे त्यावेळचा बँक-दर २ % एवढे असेल. (बँक-दर हा आरबीआय द्वारा वेळोवेळी कळविला जाईल)*

***१८.२*** *ह्याशिवाय वरील परिच्छेद १७.६ मध्ये दिलेल्या सूचनाही खाजगी क्षेत्रातील प्रतिनिधी बँकांना लागू होतील.*

### *१९. निर्धारितीद्वारा धनादेश काढणे - आदाताच्या नावे*

***(डीजीबीए.जीएडी.क्र.एच-८२९४/४२.०१.३७/२००५-०६ दिनांक डिसेंबर १४, २००५)***

*ओएलटीएएसखाली प्रत्यक्ष करांच्या प्रदानासाठी चलन जमा करण्यासाठी निर्धारिती द्वारे आदात्याच्या नावे धनादेश काढण्यात एकसमानता आणण्याच्या दृष्टीने, आयकर विभागाने आयकर चलनाच्या मागील बाजूस खालील सूचना छापण्याचे ठरविले आहे.*

*''करदात्याने करांच्या प्रदानापोटी धनादेश/धनाकर्ष कृपया खालीलप्रमाणे काढावेत/निर्गमित करावेतः*

*'प्रदान करा..............................(जेथे चलन जमा केले जाईल त्या बँकेचे नाव) — खाती आयकर''*

*हा बदल बँकानी त्यांच्या सर्व अधिकृत शाखांच्या निदर्शनास आणावा असे बँकाना कळविण्यात आले होते.*

### *२०. मुख्य शीर्षके/चलान*

***(आरबीआय/२००५/३९ (डीजीबीए.जीएडी.क्र.एच-४२/४२.०१.०३४/२००५-०६) दिनांक जुलै ४, २००५)***

*दोन नवीन करांच्या म्हणजे **उपांत लाभ कर** आणि **बँकिंग रोख व्यवहार कर**, प्रस्तुतीनंतर गरजेचे ठरल्यामुळे भारत सरकारने आणलेल्या सुधारित चलान नमुन्यांविषयी बँकाना कळविण्यात आले होते. परिणामी आयकर विभागाने खात्यांच्या मुख्य शीर्षकात आणि उप-गौण शीर्षकात केलेले बदल/सुसूत्रीकरण खाली दिले आहेः*

***चलान क्र. आयटीएनएस - २८०***

*हे चलान दोन मुख्य शीर्षकांखालील प्रदानांसाठी म्हणजे (अ) ००२० कंपन्यांवरील आयकर (निगम कर) आणि (ब) ००२१ आयकर (कंपन्यां व्यतिरिक्त).*
*आता करदात्यांना लागोपाठच्या निर्धारण वर्षाव्यतिरिक्त निर्धारण वर्षांसाठी कर प्रदान करणे शक्य व्हावे. उदाहरणार्थ- गट वर्षासाठी (एकापेक्षा अधिक लागोपाठच्या निर्धारण वर्षांसाठी) निर्धारणाच्या प्रकरणात, बँकेच्या सॉफ्टवेअर मधील निर्धारण वर्ष क्षेत्र लागोपाठच्या निर्धारण वर्षाव्यतिरिक्त कालावधीसाठी प्रदान स्वीकारण्यासाठी परिवर्तित करता येईल, जसे कि, ए.वाय. १९९१-९७, १९९२-९९, १९९३-९९ वगैरे.*

***चलान क्र. २८१***

*हे चलान टीडीएस (स्रोतातून कापलेला कर)/टीसीएस(स्रोतातून जमा केलेला कर) च्या प्रदानासाठी आहे. याची दोन मुख्य शीर्षके आहेत म्हणजे (अ) ००२० कापून घेणाऱ्या कंपन्या आणि ००२१ (ब) कंपन्यांव्यतिरिक्त कापून घेणारे. या चलानमध्ये दोन मुख्य संकेत आहेत जे करदात्याने चिन्हांकित करायचे आहेत (अ) करदात्याने देय असलेला टीडीएस/टीसीएस (गौण शीर्षक -२००) (ब) नियमित निर्धारणातून टीडीएस/टीसीएस (आयकर विभागाने ठरविलेला (गौण शीर्षक - ४००).*

*चलानमध्ये नव्याने चालू करण्यात आलेली तीन अंकी संकेत उपगौण शीर्षके खालील प्रमाणे आहेतः*

| कलम | प्रदानाचे स्वरूप | संकेत |
|---|---|---|
| २०६ सी | मनुष्याच्या वापरासाठी अल्कोहोलयुक्त दारूच्या स्त्रोतातुन जमा | ६ सी ए |
| २०६ सी | जंगल भाडेपट्ट्यातून प्राप्त केलेल्या लाकडाच्या स्त्रोतातून जमा | ६ सी बी |
| २०६ सी | जंगल भाडेपट्ट्याव्यतिरिक्त अन्य प्रकारे प्राप्त केलेल्या लाकडाच्या स्त्रोतातून जमा | ६ सी सी |
| २०६ सी | अन्य कोणत्याहि जंगल उत्पादनाच्या (तेंदू पाने नसलेले) स्त्रोतातून जमा | ६ सी डी |
| २०६ सी | भंगार मालाच्या स्त्रोतातून जमा | ६ सी इ |
| २०६ सी | वाहनतळासंबंधात कंत्राटदार किंवा परवानाधारक किंवा भाडेपट्ट्याच्या स्त्रोतातून जमा | ६ सी एफ |
| २०६ सी | टोल प्लाझा संबंधित कंत्राटदार किंवा परवानाधारक किंवा भाडेपट्ट्याच्या स्त्रोतातून जमा | ६ सी जी |
| २०६ सी | खाण किंवा दगडाची खाण यांच्याशी संबंधित कंत्राटदार किंवा परवानाधारक किंवा भाडेपट्याच्या स्त्रोतातून जमा | ६ सी एच |
| २०६ सी | तेंदू पानाच्या स्त्रोतातून जमा | ६ सी आय |

**चलान क्र. २८२**

*हे चलान अनेक करांच्या प्रदानासाठी आहे. या चलान खाली केलेले बदल खालीलप्रमाणे आहेत. :-*

*अ) सुरक्षापत्रे व्यवहार कर आधीच्या मुख्य शीर्षक ००२५ च्या जागी मुख्य शीर्षक ००३४ खाली पुनरांकित करण्यात आला आहे.*

*ब) संपत्ति कर - मुख्य शीर्षक ००३२ या चलानमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. यापूर्वी हे मुख्य शीर्षक चलान क्र. २८० मध्ये होते.*

**चलान क्र. २८३**

*निर्धारण वर्ष २०१०-११ पासून फ्रिंज बेनिफिट टॅक्स, व एप्रिल १, २००९ पासून बँकिंग कॅश ट्रॅंझॅक्शन टॅक्स काढून टाकण्यात आल्याने, सध्या हे चलन वापरात नाही.*

*बँकानी कृपया ओएलटीएएस सॉफ्टवेअरमध्ये आवश्यक ते परिवर्तन करावे आणि कर जमा करणाऱ्या सर्व शाखांना तातडीच्या प्रभावाने हे कर जमा करणे शक्य व्हावे यासाठी सर्व प्रत्यक्ष कर जमा करणाऱ्या शाखांच्या नजरेला उक्त बदल आणून द्यावेत.*

## २१. पॅन/टॅनची पडताळणी

**(आरबीआय/२००६४/५५ (डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१६१/४२.०१.०३४/२००५-०६ दिनांक जुलै ७, २००६)**

*आता असे ठरविण्यात आले आहे कि, आयकर विभाग त्यांच्या विभागीय संगणक केंद्रांच्या माध्यमातून पॅन/टॅन मास्टर, आणि त्या विभागातील करदात्यांच्या नावांचा समावेश असलेली सीडी सर्व एजन्सी बँकांच्या नोडल शाखांना देईल जी तिमाहीने अद्यतन केली जाईल. बँकांना त्यांच्या शाखांमध्ये एका साध्या डेटा पुर्नप्राप्ती सॉफ्टवेअर जे करदात्याने सादर केलेल्या चलानात नमूद केलेल्या पॅन/टॅनच्या प्रति पडताळणीसाठी वापरता येईल त्याच्यासह अंतर्गत वितरणासाठी सीडीच्या प्रतिची प्रतिकृती तयार करण्यास कळविण्यात आले होते.*

*बँकांना त्यांच्या डेटा एन्ट्री सिस्टीममध्ये स्वयंचलितपणे सीडीतील नावे आणि पॅन/टॅन पकडली जातील अशा एखाद्या सॉफ्टवेअरच्या विकासाचे समन्वेषण करण्यासाठी सुध्दा कळविले होते. सीडी मध्ये करदात्याचा पॅन/टॅन उपलब्ध नसेल तर, ग्राहकाला संबंधित पॅन/टॅन कार्डची नक्कल किंवा पॅन/टॅन बरोबर असल्याचे दर्शविणारे कोणतेहि कागदपत्र हजर करण्यास सांगावे. विभागीय संगणक केंद्रातर्फे देण्यात आलेल्या सीडीत करदात्याचा पॅन/टॅन नसल्याच्या प्रकरणात पडताळणीसाठी उपयोगात आणण्याची ही कागदपत्रे बँकानी ठेवून घेण्याची गरज नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, चलानवर वैध अशा १० अंकी अक्षरातील पॅन/टॅन नमूद केलेला आहे याची संबंधित स्वीकृती अधिकाऱ्याने प्रत्यक्ष तपासून खात्री केल्याशिवाय चलान स्वीकारू नये असे बँकाना कळविण्यात आले होते.*

### ***२२. १/१/२००५ पासून चलानवर स्थायी खाते क्रमांक (पीएएन)/कर कपात खाते क्रमांक(टिएएन) नमूद करणे सक्तीचे आहे.***

***(आरबीआय २००४/३०० (डीजीबीए.जीएडी.क्र.एच-२५३२-६५/४२.०१.०३४/२००४-०५) दिनांक डिसेंबर १४, २००४ आणि आरबीआय २००५/२६५ (डीजीबीए.जीएडी.क्र.एच-८८२४/४२.०१.०३४/२००४-०५) दिनांक डिसेंबर २८, २००५)***

*करदात्यांची योग्य आणि तातडीने जमा दाखविण्याच्या दृष्टिकोनातून, सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस (सीबीडीटी), भारत सरकार यांनी जानेवारी १, २००५ पासून चलानवर पॅन/टॅन नमूद करण्याच्या बंधनकारक तरतूदीची अंमलबाजावणी करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, करदात्याचा पॅन चलान आयटीएनएस २८० आणि २८२ वर आणि कपात करणाऱ्याचा टॅन चलान आयटीएनएस २८१ वर नमूद केल्याशिवाय बँक शाखा कर स्वीकारणार नाहीत. शाखांनी,* ***'चलानवर पॅन/टॅन नमूद करणे १/१/२००५ पासून सक्तीचे आहे'*** *असे प्रतिपादन करणारी सूचना शाखेत ठळकपणे प्रदर्शित करावी आणि त्या तारखेपासून पॅन/टॅन विना असलेली चलाने स्वीकारू नयेत. पॅन/टॅन प्राप्त करण्याची कार्यपद्धती आयकर विभागाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. (http://www.incometaxindia.gov.in किंवा http://www.tinnsdl.com). बँकानी निर्धारितीना कर जमा करण्यापूर्वी पॅन/टॅन प्राप्त करण्यासाठी सांगावे. चलान नमुना क्र. २८० आणि २८१ (आधीच छापलेल्या पॅन/टॅन क्रमांकासह असलेले) डाऊनलोड करण्याच्या सुविधेलाहि आपल्या निर्धारित बँकांद्वारे भरपूर प्रसिद्धि देण्यात यावी.*

### ***२३. ऑन लाईन टॅक्स अकाऊंटिंग सिस्टिम (ओल्टाज) डेटाच्या गुणवत्तेत सुधारणा***

***(डीजीबीए.जीएडी.क्र.३७७४/४२.०१.०३४/२००७-०८ दि. ऑक्टोबर ९, २००७, आरबीआय/२००७/२०६ - डीजीबीए.जीएडी.क्र.६२१२/४२.०१.०३४/२००७-०८ दि. डिसेंबर ६, २००७)***

#### ***२३.१ टीआयएन मध्ये अपलोड केलेल्या चलनाच्या तपशीलातील त्रुटी***

*बँकांच्या नजरेस आणण्यात आले होते की, त्यांनी टीआयएनमध्ये अपलोड केलेला ओल्टाज डेटा हा, डिडक्टर्सनी सादर केलेल्या, टीडीएस/टीसीएस रिटर्न्समार्फत सादर केलेल्या संबंधित डेटाशी जुळत नाही. ह्यात आढळून आलेल्या सर्वसाधारण त्रुटी पुढीलप्रमाणे आहेत. : -*

*(१) ओल्टाजद्वारा अपलोड केल्या गेलेल्या डेटामध्ये वटविल्या गेल्याची तारीख चलान टेंडर डेट म्हणून डिजिटाइज केली जाते.*
*(२) चुकीचा चलान अनुक्रमांक, मुख्य शीर्षक, पॅन/टॅन इत्यादि अपलोड केले जाणे.*
*(३) चलानच्या काऊंटर फॉईलवर चलानच्या अनुक्रमांकाचा शिक्का न मारला जाणे.*
*(४) एकाच चलानसाठी निर्देशिलेल्या रकमेच्या दोन वेगळ्या रकमा केल्या जाऊन त्या दोन चलानमध्ये रिपोर्ट केल्या जाणे.*

*ओल्टाज डेटा घेऊन तो अपलोड करत असताना वरील चुका टाळाव्यात असे बँकांना सांगण्यात आले होते.*

#### ***२३.२. डेटाच्या दर्जाबाबत काळज्या***

*पॅन, सीआयएन, ते टिन कळविताना बिनचुकपणा मिळविण्यासाठी प्रतिनिधी बँकांना पुढील गोष्टी करण्यास सांगण्यात आले होते. : -*

*१. टिन - एनएसडील साईटमधून बल्क पॅन सुविधेचा वापर करणे;*

*२. आवश्यक तेथे पॅनच्या पुराव्यासाठी आग्रह धरणे*

*३. ग्राहकाला दिलेला सीआयएन हा ओल्टाजवर अपलोड केलेलाच सीआयएन आहे ह्याची खात्री करुन घेणे. "डेट ऑफ टेंडर" च्या बाबतीत विशेष काळजी घेणे.*

***२४. संगणकीकृत पावत्या देणे व डेटाच्या दर्जामध्ये सुधारणा***

***(आरबीआय/२००८/३२८ आणि डीजीबीए.जीएडी. क्र.एच.१२०७०/४२.०१.०३४/२००७-०८ दि. मे २२, २००८)***

*जून ०१, २००८ पासून, जोडपत्र अ-४-१ व २ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात संबंधित माहिती असलेल्या ओल्टाज व्यवहारांच्या चलान प्रदानांच्या संगणकीकृत पावत्या देण्यास बँकांना सांगण्यात आले होते. ह्याशिवाय प्रतिनिधी बँकांना पुढील मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करण्यास सांगण्यात आले होते. : -*

*१) **डेटा एंट्रीसाठी मेकर चेकर प्रणाली :** चुकीची एंट्री होणे टाळण्यासाठी, एखाद्याने एंटर केलेला डेटा, दुसऱ्याने चेक करण्यासाठी उपयुक्त असलेल्या मेकर - चेकर प्रणालीचा काटेकोरपणे लाभ घेतला जावा.*

*२) **सॉफ्टवेअर अलर्ट :** डेटा एंट्रीमध्ये कमीत कमी चुका असाव्यात ह्यासाठी, पॅन/टॅन एंटर केला गेला नाही किंवा अयोग्य डेटा एंटर केला गेला किंवा टॅनसाठी असलेल्या स्तंभात पॅन एंटर केला गेला किंवा मायनर हेड व मूल्यांकन - वर्ष ह्यामध्ये मेळ जुळत नाही अशा प्रसंगी, गोळा करणाऱ्या शाखांमध्ये वापरल्या जाणाऱ्या डेटा एंट्रीच्या सॉफ्टवेअरमध्ये एक सावधान इशारा (अलर्ट मेसेज) समाविष्ट केला जावा.*

*३) **सॉफ्टवेअर व्हॅलिडेशन :** आयकर विभागाने दिलेली सॉफ्टवेअर व्हॅलिडेशन्स तुमच्या सिस्टिममध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत ह्याची खात्री करुन घेण्यात यावी.*

*४) **बँकस्तरावर दर्जाची हमी :** सर्व प्रतिनिधी बँकांजडून शासकीय कर गोळा करण्याच्या बाबतीत दर्जाची हमी अपेक्षित आहे.*

*५) **फेटाळालेल्या फाईल्स पुनः अपलोड करणे :** एनएसडीएलमध्ये फेटाळले जाणे टाळण्यासाठी, ओल्टाजची डेटा फाईल टिनमध्ये अपलोड करण्यापूर्वी फाईल व्हॅलिडेशन युटिलिटी (एफव्हीयु) द्वारा तपासली जावी.*

***२५. शासकीय राजस्वाबाबतच्या ई-पेमेंट व्यवहारांसाठी कट-ऑफ कालावधी***

***(आरबीआय/२००८/२७५ आणि डीजीबीए. जीएडी. क्र.१०५७७/४२.०१.०३८/२००७-०८ दि. एप्रिल ३, २००८)***

*सीबीडीटी राजस्वाचे ई-पेमेंट करण्यास प्राधिकृत बँकांना सांगण्यात आले होते की, ओल्टाजखाली संध्याकाळच्या ८.०० वाजेपर्यंत मिळालेली प्रदाने त्याच दिवशी मिळाल्याचे समजण्यात यावे व त्यानंतर मिळालेली प्रदाने त्यानंतरच्या कामाच्या दिवशी मिळाल्याचे समजण्यात यावे.*

***२६. एप्रिल १, २००८ पासून करदात्यांच्या काही वर्गांनी करावयाचे वैधानिक इलेक्ट्रॉनिक करप्रदान***

*(आरबीआय/२००८/२८० आणि डीजीबीए. जीएडी. क्र.एच.१०८७५/४२.०१.०३८/२००७-०८ दि. एप्रिल १०, २००८)*

*सीबीडीटीने पुढील प्रकारच्या करदात्यांसाठी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करभरणा करणे वैधानिक केले आहे. : -*

*अ. एखादी कंपनी*
*ब. एखादी व्यक्ती (कंपनी सोडून) जिला कलम ४४अब लागु आहे.*

*ह्यामुळे बँकांनी त्यांच्या शाखांना पुढील गोष्टी कळवाव्यात : -*

*१) नावावरुनच कॉर्पोरेट करदात्याचा दर्जा ओळखला जावा. सर्व कॉर्पोरेट करपात्र संस्थांच्या पॅनमधील ४ था अंक 'C' हा असेल. ह्यामुळे अशा करपात्र व्यक्ती/संस्थांनी प्रत्यक्ष आणलेल्या चलान्स काऊंटरवर स्वीकारल्या जाऊ नयेत.*

*२) आयटी अधिनियमाच्या कलम ४४ए.बी खाली असलेल्या करदात्यांकडून काऊंटर्सवर प्रत्यक्ष चलान्स स्वीकारल्या जाव्यात कारण ई-पेमेंट करावयाची जबाबदारी मूलतः करदात्यांची असते.*

*३) अशा ई-पेमेंटची पोच स्क्रीनवर ताबडतोब उपलब्ध केली जावी.*

*४) ई-पेमेंटच्या ट्रँझॅक्शन आयडी बँकेच्या विवरणपत्रात येईल ह्याची खात्री करुन घ्यावी.*
*५) करदात्याला कर भरण्यात, ई-पेमेंटचा व्यवहार पूर्ण करण्यात, काऊंटरवर फाईल मिळविण्यात अडचण आल्यास संपर्क साधावयाच्या अधिकाऱ्याची माहिती ई-पेमेंट गेटवे पेजवर दर्शविली जावी.*

*६) आयटीडी किंवा करदात्यांना काही अडचणी/प्रश्न आल्यास संपर्क साधण्यासाठी आयटीडी व एनएसडीएल ला अधिकाऱ्यांची यादी व संपर्क माहिती दिली जावी.*

***(आरबीआय/२००८/३२१ आणि डीजीबीए. जीएडी. क्र. एच. ११८९५/४२.०१.०३८/२००७-०८ दि. मे १५, २००८)***

*आर्थिक वर्ष २००७-०८ साठी, आयकर अधिनियमाच्या कलम ४४एबी खाली येणाऱ्या करदात्यांच्या पॅन व नावांची यादी असलेली क्षेत्रनिहाय सीडी प्रतिनिधी बँकांना देण्यात आली होती. तसेच ह्या सीडीच्या साह्याने आयटी अधिनियमाच्या कलम ४४एबी खाली असलेल्या करदात्यांनी चलानसह चेक दिल्यास पुढील कारवाई करण्यासही मदत होईल. : -*
*१) करदात्याला त्याचे प्रदान ई-पेमेंट द्वारे करण्याची विनंती करणे.*
*२) तसे करणे शक्य नसल्याचे त्याने कळविल्यास त्याचा चेक स्वीकार करुन त्याला इशारा देण्यात यावा की पुढील प्रदानासाठी असा स्वीकार केला जाणार नाही व ह्या अधिनियमाखाली त्याच्यावर कारवाई केली जाऊ शकेल.*

*३) शाखेमध्ये नेट-बँकिंग खाते उघडण्यास करदात्याला मदत करण्यात यावी.*

*४) ई-पेमेंट करण्यासाठी (जोडपत्र ४ अनुसार) काही माहिती व पायऱ्या, करदात्यांच्या माहितीसाठी बँकांना देण्यात आल्या होत्या.*

### *२७. सरकारी व्यवहारांबाबत ई - पेमेंटद्वारे धनप्रेषण करण्यासाठी अनुज्ञेय कालावधी - खाजगी क्षेत्रातील बँका व सार्वजनिक क्षेत्रातील बँका*

***(डीजीबीए.जीएडी.क्र.एच.५५१/४२.०१.०११/२००८-०९ दि. जुलै १८, २००८) आणि (आरबीआय/२०१०-११/२२९-डीजीबीए.जीएडी क्र. एच-२४४४ /४२.०१.०११/२०१०-११ दि. ऑक्टोबर ८, २०१०)***

*ईझिएस्ट व ओल्टाजसह ई - पेमेंटद्वारा मिळणाऱ्या सर्व सरकारी व्यवहारांसाठी, खाजगी क्षेत्रातील बँका व सार्वजनिक क्षेत्रातील बँका ह्यांच्यासाठी असलेला धनप्रेषण करण्याचा कालावधी अनुक्रमे, ऑगस्ट १, २००८ व नोव्हेंबर १, २०१० पासून T+1 कामाचा दिवस (भरणा केल्याचा दिवस धरुन) एवढा असेल.*

## ***२८. सरकारी खात्यात सरकारी जमा रकमेचा भरणा/धनप्रेषण करण्यात झालेल्या विलंबासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडून व्याजाची वसुली***

***(आरबीआय/२००९/४६३–****डीजीबीए.जीएडी क्र. एच-९२८४ /४२.०१.०११/२००८-०९ दि. एप्रिल २८, २००९)*

***(१) दंडात्मक व्याज आधीच भरले गेले आहे अशा प्रकरणांमध्ये, १/५/२००५ ते ३१/१२/२००६ पर्यंतच्या काळात बाधित झालेल्या व्यवहारांसाठी (रेव्हेन्यु रिसीट्स संबंधाने) भरणा केलेली तारीख वगळणे लागु करण्याबाबत : -***

*सध्या अस्तित्वात असलेल्या निदेशांनुसार, सरकारी राजस्वांचे प्रेषण करण्यातील विलंबकालाचे व्याज काढण्यासाठी "भरणा केल्याची तारीख" (पुट थ्रु डेट), प्रेषण - निकषांमधून वगळण्यात आली होती आणि बँकांनी व्याज भरले नव्हते, अशा विलंब - व्याज प्रकरणांमध्ये हे निदेश लागु करण्यात आले होते. कंट्रोलर जनरल ऑफ अकाऊंट्सद्वारा ठरविण्यात आले होते की, ज्या बँकंनी १/०५/२००५ ते ३१/१२/२००६ पर्यंतच्या काळात दंडात्मक व्याज भरले होते त्या बँकांनाही सरकारी जमा रकमेच्या धनप्रेषणासाठी असलेला कालावधी काढतांना "भरणा केल्याची तारीख" (पुट थ्रु डेट) वगळण्याची सुविधा दिली जावी. बँकांद्वारे दिल्या गेलेल्या अतिरिक्त व्याजाचे समायोजन त्यांच्याकडून विलंबकालीन व्याजाबाबतच्या पुढील मागण्या/दाव्यांमध्ये केले जावे.*

***(२) इलेक्ट्रॉनिक अकाऊंटिंग सिस्टिम इन एक्साईज अँड सर्व्हिस टॅक्स (ईझिएस्ट) खाली बाहेरगावच्या व्यवहारांसाठी सरकारी राजस्वाचा भरणा सरकारी खात्यात करण्याचा अनुज्ञेय कालावधी : -***

*असे ठरविण्यात आले आहे की, बाहेरगावच्या व्यवहारांसाठी जास्तीत जास्त T+5 कामाचे दिवस (पुट थ्रु डेट सोडून) एवढा कालावधी देण्यात येईल. आमचे परिपत्रक क्र. आरबीआय/२००८/०९/९७ दि. जुलै १८, २००८ मध्ये दिलेल्या, वेगळ्या दिलेल्या निदेशांनुसार केलेल्या ई - पेमेंट्साठी (इंटरनेटद्वारा केलेले प्रदान) हे लागु होणार नाही.*

***(३) जमा केलेल्या सरकारी रकमांचे विलंबाने प्रेषण केल्याने क्षुल्लक/बारीक सारीक रकमांचे दंडात्मक व्याज आकारणे : -***

*असे ठरविण्यात आले आहे की, रु. ५००/- किंवा त्यापेक्षा कमी विलंबकाळ दंडात्मक व्याजाकडे दुर्लक्ष केले जाईल व जानेवारी १, २००८ पासून ते दंडात्मक व्याज दंडात्मक व्याजाच्या क्षेत्रातून वगळले जाईल.*

***(४) ओल्टाजच्या सुरुवातीच्या काळात डीलिंग शाखांना आलेल्या सुरुवातीच्या बारीकसारीक अडचणींमुळे दंडात्मक व्याज न आकारणे : -***

*प्रणाली स्थिरतेने काम करण्यापूर्वी ओल्टाजची अंमलबजावणी केली जात असतानांच्या सुरुवातीच्या काळात येणाऱ्या निरनिराळ्या अडचणींचा विचार करता, सहा तिमाहींना (म्हणजे १/०४/२००५ ते ३०/०९/२००६) दंडात्मक व्याजाच्या क्षेत्रातून सूट देण्याचे ठरविण्यात आले आहे. ह्याशिवाय, हे निदेश, वित्त मंत्रालयाच्या ठेवी योजनांना, म्हणजे पीपीएफ/एससीएसएस च्या निधीप्रेषणाला लागु होणार नाहीत.*

***२९. दूरगामी स्थळे, अडथळे असलेल्या आणि डोंगराळ भागांसाठी शासकिय खात्यामध्ये सरकारी महसूलाच्या प्रेषणाचा मंजूरी मिळालेला कालावधी***

*(**आरबीआय/२००९-१०/३८१**-डीजीबीए.जीएडी क्र. एच-७७९० /४२.०१.०११/२००९-१० दिनांक एप्रिल ६, २०१०)*

*असा निर्णय घेण्यात आला कि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना शासकिय उत्पन्नांच्या सी ए एस, आर बी आय, नागपूर यांना केलेल्या मानवी प्रेषणाला, जम्मू आणि काश्मिर, लेह, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, सिक्किम, उत्तर-पूर्व भाग (अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड आणि त्रिपूरा), झारखंड आणि छत्तिसगढ येथे असणाऱ्या शाखांच्या संदर्भामध्ये, टी +१२ कामकाजाच्या दिवसांचा कालावधी (ज्यामधुन शाखेमध्ये पैसे उपलब्ध असणाचा जिथे टी हा दिवस असतो, अशा पूट थ्रु डेटला वगळून) १.१.२०१०पासून मंजूर करण्यात आला आहे.*

*दूरगामी स्थळे, अडथळे असलेल्या आणि डोंगराळ भागांसाठी असलेले वरील नियम वित्त मंत्रालयाच्या पी पी एफ/एस सी एस एस इ. भरणा योजनेच्या अंतर्गत असणाऱ्या निधीच्या प्रेषणासाठी लागु होत नाहीत.*

.....................................................................

## *ऑनलाइन टॅक्स अकाउंटिंग सिस्टीम (ओएलटीएएस) च्या संबंधातील हिशोबाची कार्यपद्धती*

### *१. स्वीकृती बँकांमध्ये कर स्वीकारण्यासाठी कार्यपद्धती*

*__१.१__ करदाता कोणत्याहि अधिकृत बँकेच्या अधिकृत शाखेत रोख, त्याच्या खात्यातून थेट वजावटीद्वारे किंवा जेथे प्रदान करण्यात येते त्याच केंद्रातील दुसऱ्या बँकेवर/शाखेवर दिलेल्या धनादेश/ धनप्रेष द्वारे कर प्रदान करू शकतो. कराचे प्रदान कोणत्याहि अधिकृत बँकेत बाहेरगावच्या धनादेशाद्वारे किंवा अधिकृत बँकेला वित्तप्रेषणाच्या इलेक्ट्रॉनिक पध्दतीद्वारे करता येईल. प्रत्येक प्रदानासाठी विहित नमुन्यातील चलान आवश्यक आहे. चलानचा नमुना हा एक वरच्या बाजूला मुख्य चलान आणि चलानच्या तळाशी करदात्याची स्थळप्रत असलेली चलानची एकमेव प्रत आहे. (नमुना परिशिष्ट 'अ' मध्ये).*

### *१.२ स्वीकृती बँक शाखेच्या खिडकीवर(काउंटर)*

*स्वीकृती बँकेचा प्राप्तकर्ता लेखनिक/गणकाने (टेलर)प्रदान स्वीकारताना खालील बाबी तपासून घेतल्या पाहिजेतः-*

*अ. चलानचा मुख्य भाग आणि कर कपात लेखा क्रमांक (टॅन). करदात्याचे नाव आणि पत्ता, निर्धारण वर्ष आणि प्रदानाचे स्वरूप आणि प्रदान योग्य प्रकारे भरले आहेत अथवा नाही. रक्कम अंकी आणि अक्षरी बरोबर लिहिलेली असली पाहिजे.*

*(ब) परमनंट अकाऊंट नंबर (पॅन), किंवा टॅक्स डिडक्शन नंबर (टॅन), करदात्याचे नाव व पत्ता, मूल्यमापनाचे वर्ष आणि प्रदान करण्याचे स्वरुप व प्रकार योग्य प्रकारे भरला आहे काय. रक्कम ही योग्य प्रकारे आकड्यात व शब्दात लिहिली जावी.*

*क. स्थायी लेखा क्रमांक (पॅन) चलानमध्ये विहित जागी नमूद केलेला आहे किंवा नाही. आयकर अधिनियमाच्या कलम १३९ ए ५ (बी) आधीन पॅन नमूद करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे अधिनियमाच्या कलम २०३ ए आधीन टॅन नमूद करणे बंधनकारक आहे. करदात्याने नमूद केलेला पॅन विधीग्राह्य करावा (तो पॅन/टॅन च्या वैध रचणेनुसार आहे किंवा नाही ते तपासून पहाणे) आणि कर स्वीकारणाऱ्या निर्धारित बँकेने चलानमध्ये वैध पॅन नमूद केलेला असेल तरच चलान स्वीकारली जातील याची खात्री करावी. तथापि, जेथे करदाता असे दर्शवितो कि, त्याने पॅन/टॅनसाठी अर्ज केला आहे परंतु अजून तो त्याला मिळालेला नाही, परंतु जर करदाता पॅन/टॅन अर्ज क्रमांक चलानमध्ये दर्शवीत असेल तर कर प्रदान चलान बँकेने स्वीकारावे. अशा बाबतीत __करदात्याने चलानमध्ये आपला पूर्ण पत्ता नमूद केला आहे याची खात्री करावी__.*

*__१.३__ चलानची छाननी केल्यानंतर आणि सादर केलेली रोख रक्कम किंवा धनादेशाची/धनप्रेषाची चलाना मध्ये दाखविलेल्या रकमेशी जुळते आहे, आणि धनादेश नंतरच्या तारखेचा/ मुदतबाह्य नाही याबाबत समाधान झाल्यानंतर शाखेचा स्वीकृती गणक किंवा खिडकी लेखनिक करदात्याला स्थळप्रतीची प्राप्ती करणे सोयीचे व्हावे यासाठी त्याला कागदी ओळखचिन्ह (टोकन)देईल. अन्य बँक शाखेवर दिलेल्या धनादेशासह सादर केलेल्या चलानच्या बाबतीत, स्थळप्रतीची पावती धनादेशाची किंवा धनप्रेषाची रक्कम वसूल झाल्यानंतर देण्यात येईल आणि म्हणून कागदी ओळखचिन्हावर ती कधी उपलब्ध होईल याचा उल्लेख असावा.*

### *१.३.१ रोख रकमेसह सादर केलेली चलाने*

*रोख रकमेसह सादर केलेले चलान छाननीनंतर योग्य आहे असे दिसून आले तर "त्यावर __रोख रक्कम मिळाली__"__(कॅश रिसीव्हड)__ असा शिक्का उमटवावा. बँकेने चलानच्या मुख्य भागावर आणि करदात्याच्या*

*स्थळप्रतीवर बँक आणि शाखा, शाखेचा बीएसआर संकेत(७ अंकी), रक्कम जमा केल्याची तारीख (डीडी/एमएम/वायवाय) चलानचा अनन्य अनुक्रमांक (५ अंकी) नमूद करणारा शिक्काही उमटवावा. शिक्क्याचा ठसा मुख्य भाग आणि करदात्याची स्थळप्रत अशा चलानच्या दोन्ही बाजूंवर उमटवावा. शिक्क्याचा ठसा स्पष्ट आणि वाचनीय आहे याची काळजी घ्यावी.*

*शाखेचा अधिकृत अधिकारी चलानच्या करदात्याच्या स्थळप्रतीवर रक्कम प्राप्त झाल्याबद्दल पूर्ण सही करील आणि मुख्य भाग़ावर आद्याक्षरांनी सही करील. करदात्याच्या स्थळप्रतीवर प्राप्त झालेली रक्कम अक्षरी आणि अंकी अशी दोन्ही प्रकारे दर्शविली जाईल. करदात्याच्या स्थळप्रतीची स्वीकृती पोच सादरकर्त्याला परत दिली जाईल आणि मुख्य प्रत त्यानंतर लेखपट्टिका तयार करण्यासाठी स्वीकृती लेखपट्टीकेकडे(रिसीट स्क्रोल) पाठविली जाईल.*

### *१.३.२ धनादेश(चेक)/धनप्रेष (ड्राफ्ट)सह सादर केलेली चलाने*

*धनादेश/धनप्रेषासह सादर केलेल्या चलानावर साधन सादर करण्याची तारीख त्याचप्रमाणे रक्कम वसूल झाल्याची तारीख दर्शविण्यासाठी 'दुहेरी तारखेचा ठसा' उमटविला जाईल. हे शक्य आहे कि, काही बँका खिडकीवर चलान सादर केल्यानंतर लगेच आवक तारखेचा शिक्का उमटविण्याच्या पध्दतीचे अनुसरण करीत असतील. त्या प्रकरणात दुहेरी तारखेच्या शिक्क्याची गरज भासणार नाही. तथापि, चलानच्या करदात्याच्या स्थळप्रतीवर आणि मुख्य प्रतीवर, दोन्हीवर आवक तारखेचा शिक्का न चुकता उमटविला आहे याची खात्री करून घेतली जाईल.*

*तपासणी आधिकारी प्रथम सादर करणाऱ्याने नोंदलेली रक्कम आणि धनादेश/धनप्रेष यांच्यात फरक नाही याची खात्री करून घेईल. त्यानंतर, धनादेश/धनप्रेषच्या वसूलीनंतर, **दुहेरी शिक्क्यावर किंवा चलानमध्ये त्यासाठी असलेल्या जागेत, जसे असेल त्याप्रमाणे**, वसूल झाल्याची तारीख  दर्शविली जाईल. बँक एकमेव चलानच्या करदात्याच्या स्थळप्रतीवर आणि मुख्य प्रतीवर बँकेचे नाव आणि शाखा, शाखेचा बीएसआर संकेत (७ अंकी) रक्कम जमा केल्याची तारीख आणि चलानचा अनन्य अनुक्रमांक (५ अंकी) दर्शविणारा शिक्का उमटवेल. रक्कम प्राप्त झाल्याबद्दल चलानवर सही केल्यानंतर, करदात्याची स्थळप्रत सादर करणाऱ्याला ओळखचिन्ह परत केल्यानंतर दिली जाईल.*

### *१.३.३ चलानला क्रमांक देणे*

***प्रत्येक दिवसासाठी** चलानला (रोख प्रदान केलेल्या आणि धनादेश द्वारे प्रदान केलेल्या अशा दोन्ही) धावते अनुक्रमांक देण्यात येतील. याची खात्री करून घेतली पाहिजे कि, प्रत्येक चलानवरील अनुक्रमांक नंतर शोधणे शक्य व्हावे यासाठी **अनन्य** असेल. **त्यासाठी बँकेने खात्री केली पाहिजे कि, रोख रकमेसह जमा केलेल्या चलानला दिलेले अनुक्रमांक त्या दिवशी वसूल झालेल्या धनादेशांसमक्ष चलानाना दिलेल्या अनुक्रमांकशी परस्परव्याप्त होणार नाहीत.***

*रोख रकमेसह आणि त्याच शाखेच्या धनादेशासह सादर केलेल्या चलानांच्या स्थळप्रती सादर करणाऱ्याला योग्य पावतीसह खिडकीवरून परत दिल्या पहिजेत. त्याच बँकेच्या वेगळ्या शाखेवर किंवा त्याच केंद्रात स्थित असलेल्या अन्य कोणत्याहि बँकेवर दिलेल्या धनादेशासह/धनप्रेषासह सादर केलेल्या चलानांची करदात्याची स्थळप्रत, कोणत्याहि दिवसाच्या क्लियरिंगच्या अप्रदत्त साधनांच्या परताव्यासाठी 'लोकल बँकर्स क्लियरिंग हाऊस' च्या नियमांआधीन निश्चीत केलेल्या दिवसाच्या नंतरच्या कामकाजाच्या दिवसापेक्षा उशिरा नाही अशी योग्य पावतीसह परत केली पाहिजे.*

***१.४.१** धनादेश/धनप्रेषासह सादर केलेल्या चलानांच्या बाबतीत, चलानच्या मुख्य भागावर, जो बँकेकडे झोनल अकाऊंटस ऑफिस (झेडएओ) कडे स्वीकृती लेखपट्टिकेसह पाठविण्यासाठी राखून ठेवण्यात येतो, धनादेश वसूल झाल्याच्या तारखेचा सुध्दा शिक्का मारला पाहिजे. यद्यपि, आयकर अधिनियमानुसार धनादेश/धनप्रेष वसूल झाल्याची तारीख ही कर प्रदान केल्याची तारीख मानली जाईल, धनादेश/धनप्रेष वसूल झाल्यानंतरच लेखपट्टिकेवर घेतले जातील.*

***१.४.२ स्वीकृत चलानवर दुहेरी तारीख***

*त्यामुळे, चलानच्या ज्या मुख्य भागाद्वारे धनादेश/धनप्रेष जमा केला जातो. त्यावर खालीलप्रमाणे दोन तारखा असतीलः*

*१) सादर केल्याची तारीख : डिडिएमएमवायवाय (रबरी शिक्याच्या पोचपावतीत)*

*२) वसूलीची तारीख : डिडिएमएमवायवाय (चलानमध्ये दर्शविलेल्या जागी)*

*रोख रकमेच्या बाबतीत 'सादर केल्याची तारीख' आणि 'वसूलीची तारीख' एकच असतील.*

***१.४.३*** *स्वीकृती बँक* ***अन्य कोणत्याहि स्वरूपात पावती देणार नाही.***

***२. स्वीकृती शाखेने लेखपट्टिका तयार करणे***

***२.१ प्रत्येक दिवशी*** *ज्यांच्या समक्ष रोख प्रदान करण्यात आले आहे किंवा त्या तारखेला धनादेशाची/धनप्रेषाची वसूली झाली आहे अशा सर्व चलानांना धावता अनुक्रमांक देण्यात येईल.*

***२.२*** *चलानची, नाव आणि पॅन, अनुक्रमांक, जमा केल्याची तारीख आणि शाखेचा बीएसआर संकेत अशी सर्व क्षेत्रे करदाता जेव्हा बँकेच्या खिडकीवर चलान जमा करील तेव्हा पकडणे आवश्यक आहे. चलानांच्या डेटा रचनेची क्षेत्रे ज्यासाठी डेटा पकडणे आणि पारेषित करणे आवश्यक आहे ती आयकर विभागातर्फे बँकाना नंतर कळविण्यात येतील. स्थायी लेखा क्रमांक(पॅन) आणि करदात्याचे नाव न चुकता पावती आणि प्रदान लेखपट्टिकेवर अंतर्भूत करावे.*

***२.३*** *ग्राहकांसाठी बँकिंगच्या वेळेच्या समाप्तीनंतर, बँक शाखेने त्या दिवशी रोख प्रदान ज्यांच्या समक्ष मिळाले आहे ती चलाने आणि त्या दिवशी धनादेश/धनप्रेष द्वारे प्रदान वसूल झाले आहे ती चलाने शोधून काढावीत. या चलानांची माहिती आधीच बँकेच्या संगणक यंत्रणेत असल्यामुळे, बँकेने त्या दिवशी ज्यासाठी प्रदान वसूल झाले आहे तो चलान डेटा समाविष्ट असलेली फाइल तयार करावी आणि बँकेच्या जोडकक्षामार्फत आयकर विभागाकडे पाठविण्यासाठी ती नोडल शाखेकडे पारेषित करावी.*
***तथापि, नॉन-कॉम्प्युटराइजड/ नॉन-नेटवर्कड अधिकृत शाखांनी त्यांच्या सर्वात नजीकच्या कॉम्प्युटराइजड/नेट-वर्कड शाखेतून डेट नोडल शाखेकडे पारेषित होईल याची खात्री करावी. त्या दिवशी प्रदान वसूल झालेले कोणतेहि चलान मागे राहणार नाही याची खात्री करावी. विशिष्ट दिवशी पारेषित केलेल्या कराच्या प्रत्येक प्रकारच्या नोंदीसाठी(मुख्य शीर्षक) संपूर्ण आर्थिक वर्षात(१ एप्रिल ते ३१ मार्च) चालू राहणारा अनुक्रमांक देण्यात यावा.*** *बँकेने विभागाकडे पारेषित करावयाच्या नोंदींचे आणि फाइल्सची रचना आयकर विभागाच्या विहित नमुन्यात असेल.* ***स्वीकृती शाखेने ऑनलाइन डेटा फाइल आयकर विभागाकडे पारेषित केल्यानंतर त्यात कोणत्याहि परिस्थितीत बदल करता कामा नये.***

***२.४ क्लियरिंग विवरणपत्रांचा परामर्ष***
*स्वीकृती शाखेने जी चलानांच्या समक्ष साधने प्रदान न होताच परत आली आहेत ती सुध्दा शोधून काढावीत. अशी साधने संबंधित चलानासह योग्य ती पुढील कारवाई करण्यासाठी बँकेत वेगळी ठेवावीत.*

***२.५*** *आयकर विभागाकडे जो चलान डेटा पारेषित केला आहे, त्याची दैनिक तत्त्वावर कराच्या प्रकाराच्या(मुख्य शीर्षक) आधारे लेखपट्टिकेचे वेगळे प्रिंटआऊट फॉर्म स्वरुपात आणि सारांश फॉर्म स्वरूपात स्वीकृती शाखेने आपल्या संगणकावर निर्माण करावेत. संबंधित दिवसासाठी पारेषित केलेल्या लेखपट्टिकेला देण्यात आलेले वर्षभर(१ एप्रिल ते ३१ मार्च) चालू राहणारे धावते अनुक्रमांक, संबंधित कराच्या प्रकाराच्या (मुख्य शीर्षक) आधी योग्य लघुरूप देऊन लेखपट्टिकेवर छापण्यात येतील. स्वीकृती शाखा आयकर विभागाकडे पूर्वी पारेषित केलेल्या डेटामध्ये कोणत्याही प्रकारे बदल केलेल्या डेटापासून कोणतीहि छापील लेखपट्टिका किंवा सारांश तयार निर्माण करणार नाहीत. अशा प्रकारे, शाखेने निर्माण केलेली लेखपट्टिका बँकेने विभागाच्या टीआयएनकडे ऑनलाइन पारेषित केलेल्या डेटापासून आरसीसीने निर्माण केलेल्या लेखपट्टिकेशी तंतोतंत जुळली पाहिजे. त्यानंतर शाखा संगणकावर छापलेला सारांश आणि पावती*

*लेखपट्टिकेचा संच तयार करील आणि प्रत्येक लेखपट्टिकेला प्रत्यक्ष चलाने, ती लेखपट्टिकेवर ज्या नोंदलोली आहेत त्याच क्रमाने जोडील. पुढच्या कामकाजाच्या दिवसाच्या सुरुवातीला, स्वीकृती शाखा ती पुढे **झेडएओ कडे पारेषित** करण्यासाठी नोडल शाखेकडे रवाना करील.*

### *२.६ एरर रेकॉर्डचे पारेषण*

*स्वीकृती बँक शाखेने करदात्याने प्रदान केलेली रक्कम किंवा प्रदानाचे मुख्य शीर्षक कळविताना काही चूक केली तर बँकेने दुरुस्त केलेली माहिती एरर रेकॉर्ड मार्फत टीआयएनला ऑनलाइन पारेषित करावी ज्याचा नमुना आयकर विभागाने विहित केल्यानुसार असेल. रकमेतील आणि खात्याच्या शीर्षकातील चुकीची दुरुस्ती झेडएओला सुध्दा नोडल शाखेमार्फत पाठवावयाच्या 'एरर स्क्रॉल' द्वारे कळवावी. केवळ बँकेने टीआयएनला कळविलेली कराच्या प्रदानाची रक्कम आयकर विभाग करदात्याने प्रदान केलेली कराची रक्कम म्हणून स्वीकारील.*

### *३. आयकर परताव्याच्या आदेशाच्या (आयटीआरओज)/ प्रदानाची कार्यपद्धती /इसीएस*

***३.१** थेट कर परताव्याचे काम अधिकृत बँकेच्या केवळ एकाच शाखेकडे सोपविले जाते, साधारणपणे आयटीडी सेंटर/जिल्ह्यातील भारतीय रिझर्व बँक, भारतीय स्टेट बँक किंवा तिच्या सहयोगी बँका. परताव्याचे आदेश करदाता त्याच शाखेतील त्याच्या खात्यात हस्तांतरित करण्यासाठी बँकेला सादर करील. परताव्याचे आदेश काढण्यासाठी अधिकार असलेल्या आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांची नमुना सही आयकर विभाग प्राधिकारी संबंधित प्रदाता शाखेला आगाऊ पाठवतील. नमुना सही बँकेच्या रेकॉर्डवर आधीच नमुना सही असलेल्या आयकर विभागाच्या अधिकऱ्याद्वारे उचित प्रकारे प्रमाणित केली जाईल. अधिकृत अधिकाऱ्यातील बदल संबंधित शाखेला ताबडतोब कळविला जाईल. कार्यमुक्त अधिकारी कार्यमोचक अधिकाऱ्यांची नमुना सही प्रमाणित करील. परताव्याचे आदेश प्रदानासाठी संमत करताना, संमत करणारा अधिकारी परक्राम्य लेखांच्या प्रदानासंबंधात साधारणपणे घेतल्या जाणाऱ्या काळजी व्यतिरिक्त लेखा महानियंत्रक तसेच रिझर्व बँकेतर्फे वेळोवेळी निर्गमित केल्या जाणाऱ्या सूचनांबाबतही कमालीची काळजी घेईल. आदात्याने आयकर परताव्याच्या आदेशाच्या (आटीआरओ) मागील बाजूस 'दावा करणाऱ्याची सही' साठी दिलेल्या जागेत त्याची सही केली पाहिजे. प्रदत्त आयटीआरओची सुचनापत्रे आणि छापील प्रदान लेखपट्टीका यापुढे बँका आयकर विभागाकडे पाठविणार नाहीत या व्यतिरिक्त परताव्याच्या सुचनापत्रांच्या संबधातील कार्यपद्धती सध्या प्रमाणेच पुढे चालू राहील.*

***३.२** पावत्यांप्रमाणेच, परतावे सुध्दा प्रदाता शाखेने ज्या प्रकारच्या करा आधीन परतावा देण्यात असेल त्यानुसार वर्गीकृत करणे आवश्यक आहे. आयटीआरओच्या संबंधात मुख्य शीर्षक निहाय वेगळी नोंद ठेवण्यात येईल.*

***३.३** प्रत्यक्ष कर परतावा आरबीआयच्या इलेक्ट्रॉनिक क्लियरिंग सिस्टीम(इसीएस) द्वारे सुध्दा थेट करदात्यांच्या बँक खात्यात जमा करता येईल. या सुविधेचा उपयोग करण्यासाठी करदाता त्याच्या आयकर विवरणपत्रात बँक खात्याचा प्रकार(बचत किंवा चालू), खाते क्रमांक आणि बँक शाखा संकेत (९अंकी) नमूद करून अधिकार देतो. निर्धारण अधिकाऱ्याने करदात्यांच्या विवरणपत्राची प्रक्रिया केल्यानंतर आणि परतावा निश्चित केल्यावर, आरसीसीच्या अधिकारितेतील सर्व करदात्यांचे परतावे (ज्यांनी इसीएस द्वारे जमा करण्याची मागणी केली आहे) स्वयंचलितपणे आरसीसी मधील संगणक यंत्रणेत एकत्रित केले जातात. हा सर्व परतावा डेटा मॅग्नेटीक मिडिया (फ्लॉपी किंवा रिरायटेबल सीडी) वर डाऊनलोड, एनक्रिप्ट आणि कॉपी केला जातो किंवा इलेक्ट्रॉनिकली पारेषित केला जातो. आरसीसी तो स्थानिक झेडएओ तसेच आराबीआयच्या किंवा एसनबीआयच्या परतावे निर्गमित करणाऱ्या शाखेकडे पाठविते. डेटा फाईलमध्ये विधीग्राह्य केल्यावर, बँक आयकर विभागांच्या खात्यातून एकूण परताव्याच्या रक्कम वजा करते आणि त्यानंतर जेथे करदात्यांची खाती आहेत अशा बँकेच्या वेगवेगळ्या शाखांना क्लियरिंग मार्फत आयकर विभागाने कळविलेली रक्कम करदात्याच्या खात्यात जमा करण्यासाठी सूचना निर्गमित करते. विभागाच्या खात्यात बँकेने त्या दिवसासाठी आयकर विभागाकडे पारेषित केलेल्या प्रदानाच्या (परतावा)डेट्यात एकच **वजावट** दिसते. करदात्याच्या खात्यात यांपैकी एखादी जमा खाते बंद होणे वगैरे सारख्या कोणत्याहि कारणाने प्रभावी न झाल्यास, ती नंतर आयकर विभागाच्या खात्यात इसीएस विवरणपत्रासाठी स्वतंत्र वजा नोंदीद्वारे हिशोबात धरली जाते*

*आणि त्या विशिष्ट दिवसासाठी पारेषित केलेल्या प्रदान डेट्यामार्फत आयकर विभागाला कळविली जाते. इलेक्ट्रॉनिक मिडियातील(फ्लॉपी किंवा रिरायटेबल सीडी वगैरे) फाइल्स संगणक मुद्रित प्रदान(परतावा) लेखपट्टिकेसहित झेडएओ कडे पाठविल्या जातात तर तोच डेटा बँक, आयकर विभागाच्या टॅक्स इन्फर्मेशन नेटवर्क (टीआयएन) द्वारे आयकर विभाग़ाकडे ऑनलाइन पारेषित करते.*

***४. प्रदान (परतावा) लेखपट्टिका तयार करणे.***

***४.१*** *प्रदान लेखपट्टिका तयार करण्याची कार्यपद्धती स्वीकृती लेखपट्टिकेला लागू असलेल्या कार्यपद्धती सारखीच आहे.*

***४.२*** *लेखपट्टिका स्वीकृतीशी संबंधित संचाप्रमाणेच संचात तयार करण्यात येतील फक्त चलानच्या ऐवजी लेखपट्टिकेबरोबर परतावा आदेश असतील. सर्व प्रदत्त परतावा प्रमाणांकांसंबंधातील संपूर्ण डेटा बँक पुढे विभाग़ाच्या टीआयएनकडे पारेषित करण्यासाठी इलेक्ट्रॉनिकली जोडकक्षाकडे पारेषित करील तर प्रत्यक्ष लेखपट्टिका प्रदत्त परतावा आदेशांसह नोडल शाखेद्वारे झेडएओकडे पाठविली जाईल. नोडल शाखा जर स्थानिक नसेल तर वरील सर्व कागदपत्रे (स्वीकृती/प्रदान लेखपट्टिका वगैरे) न चुकता नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात यावी.*

***४.३*** *इसीएस परताव्यांच्या बाबतीत, डेटा जोड कक्षाकडे ऑनलाइन पारेषित केला जाईल आणि त्यानंतर आयकर विभागाकडे तर इलेक्ट्रॉनिक मिडीयावरीला तेच इसीएस विवरण प्रदाता बँक नोडल शाखेमार्फता स्थानिक झेडएओकडे पाठवील.*

***५. करदात्याने स्थळप्रत हरवणे***

***५.१*** *ठेवीदाराने स्वीकृतीकृत चलान स्थळप्रत हरवल्यास, बँक शाखा, निर्धारितीकडून* ***जमा रकमेसाठी प्रमाणपत्राच्या*** *निर्गमनाच्या मागणीसाठी विशिष्ट लेखी विनंती प्राप्त झाल्यावर, प्रत्येक प्रकरणातील अर्जदाराच्या खरेपणाविषयी त्यांचे समाधान झाल्यावर त्यांच्याकडील नोंदीच्या आधारे ते ठेवीदाराला देऊ शकतात आणि त्यांच्या निर्णयाने नाममात्र शुल्क आकारू शकतात. प्रमाणपत्रावर चलानचे विवरण म्हणजे रक्कम, बँकेचे नाव आणि शाखा, बीएसआर संकेत आणि धनादेश/रोख जमा केल्याची तारीख, मुख्य शीर्षक, चलान अनुक्रमांक, धनादेश वसूल झाल्याची तारीख/रोख जमा केल्याची तारीख आणि स्वीकृती शाखेचा लेखपट्टिका क्रमांक आणि पूर्वी ज्या तारखेला कर प्रदानाचे विवरण पारेषित केले होते ती तारीख या बाबी नमूद कराव्यात.*

***६. नोडल बँकेची कार्ये***

*तत्पर आणि अचूक पारेषण, तिच्या अधिकारितेतील(तिच्या स्वतःच्या स्वीकृतींसह) स्वीकृती शाखांनी रोज कळविलेल्या जमा/परताव्याचा हिशोब ठेवणे यासाठी नोडल शाखा जबाबदार असेल. तिच्याशी जोडलेल्या सर्व स्वीकृती शाखांची जमा(स्वतःकडील जमेसह) तत्परतेने आरबीआय, सीएएस, नागपूर येथील सरकारी खात्यात वित्तप्रेषित करण्यासाठी सुध्दा ती जबाबदार असेल. झेडएओबरोबर आंकड्यांचा मेळ घालण्यासाठी सुध्दा ती जबाबदार असेल.*

***६.२*** *स्वीकृती शाखांकडून विशिष्ट दिवशी वसूल झालेल्या सर्व चलानांबाबत डेटा प्राप्त झाल्यावर, नोडल शाखा दैनिक तत्त्वावर खालील कारवाई करील. :-*

> ***अ.*** *ती आपल्या संगणक यंत्रणेवर सर्व चलान डेटा एकत्रित करील आणि आयकर विभागाने विहित केलेल्या नमुन्यात डेटा, त्या दिवशी पारेषित करण्यात आलेल्या सर्व चलान नोंदींसाठी एकसमान लेखपट्टिका क्रमांक आणि तारीख देऊन पुढे विभागाच्या टीआयएनकडे पाठविण्यासाठी तिच्या जोड कक्षाकडे पारेषित करील.*
>
> ***ब.*** *ती फ्लॉपी किंवा अन्य कोणत्याहि मीडियातील (झेडएओने कळविल्याप्रमाणे) संगणकीय डेट्याच्या आधारे मुख्य लेखपट्टिका आणि सारांश निर्माण करील आणि*

*कामकाजाच्या पुढील दिवशी झेडएओकडे पारेषित करील.*

**क.** *स्वीकृती शाखांकडून संगणक-निर्मित शाखा लेखपट्टिकेची हार्ड कॉपी प्राप्त झाल्यानंतर, नोडल शाखा या संगणक-निर्मित लेखपट्टिका, पूर्वी स्वीकृती शाखानी पारेषित केलेल्या डेटाशी तंतोतंत जुळत आहेत याची खात्री करील. स्वतःसह सर्व शाखांकडून प्राप्त झालेल्या या सर्व संगणक मुद्रित शाखा लेखपट्टिका (चलानसह) मुख्य शीर्षक निहाय मुख्य लेखपट्टिकेसह शिवून एकत्रित करील. ती मुख्य शीर्षक निहाय मुख्य लेखपट्टिका आणि सारांश यांचे संगणक प्रिंटआऊटसुध्दा तयार करील.* ***त्यानंतर ती त्यांना(चलानसह) संबंधित झेडएओकडे दैनिक तत्त्वावर पाठवील.***

**ड.** *वर (सी) मध्ये चर्चिल्याप्रमाणे त्याच पध्दतीने चलानशिवाय लेखपट्टिकेचा तयार केलेला दुसरा संच नोडल शाखा आपल्या दफ्तरासाठी ठेवून घेईल.*

**इ.** *अशाच प्रकारे, नोडल शाखा प्रदानासाठी(म्हणजे परतावा)संगणक मुदित स्वतंत्र मुख्य लेखपट्टिका निर्माण करील, आणि त्या प्रदत्त आयटीआरओजसह झेडएओकडे पाठवील. ती इसिएस परताव्याचे विवरणसुध्दा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे झेडएओकडे पाठवील. परतावा डेटा (कागदी आयटीआरओज आणि इसीएस परताव्यासंबंधातील) नोडल शाखा जोड कक्षाद्वारे टीआयएनकडे ऑनलाइन पारेषित करील. प्रदत्त आयटीआरओजची प्रमाणके ती ठेवून घेईल.*

**फ.** *प्रत्येक वर्षी एप्रिलच्या पहिल्या १५ दिवसांत, नोडल शाखा लेखपट्टिकेचे दोन संच तयार करतील-एप्रिल च्या व्यवहाराशी संबंधित एक समान्य लेखपट्टिका, आणि दुसरी, मार्चच्या व्यवहाराशी ( याचा अर्थ स्वीकृती शाखेने ३१ मार्चपर्यंत सादर केलेल्या आणि वसूल झालेल्या धनादेशांची/ धनप्रेषांची/आयटीआरओजची ३१ मार्च नंतर परंतू १५ एप्रिलपूर्वी पाठविलेली लेखपट्टिका)संबंधित- या नोडल शाखा मार्च अवशिष्ट खाते म्हाणुन लेखपट्टिकेवर घेईल. नोडल शाखा नागपूर येथील जोड कक्षाला हे व्यवहार मार्चचे व्यवहार म्हणून समाविष्ट करण्यासाठी कळवील. नोडल शाखा, एप्रिलसाठी दुसरी लेखपट्टिका खात्याचा महिना ठळकपणे दर्शवून पाठवील. ३१ मार्च रोजी किंवा पूर्वी सादर केलेला १ एप्रिल रोजी किंवा नंतर वसूल झालेला कोणताहि धनादेश/धनप्रेष एप्रिलच्या व्यवहाराचा भाग समजण्यात येईल. तथापि, दिलेल्या दिवशी ज्यांचे प्रदान वसूल झाले आहे अशा सर्व चलानांचा डेटा आयकर विभागाकडे त्याच दिवशी ऑनलाइन पारेषित करावा ही सूचना विचारात घेता, मार्चसाठी स्वतंत्र अवशिष्ट लेखपट्टिका केवळ अपवादात्मक प्रकरणात आवश्यक असेल.*

**ग.** *नोडल शाखा तिने हिशोब केलेली एकत्रित रक्कम दैनिक तत्त्वावर तिच्या जोड कक्षाकडे पाठवील.*

### *७. जमा कर सरकारी खात्यात जमा करणे*

***७.१*** *नोडल शाखा तिच्या नियंत्रणाखाली येणाऱ्या सर्व शाखांसाठी संचय केंद्र म्हणुन काम करते आणि व्यवहार झेडएओकडे कळविण्यासाठी(चलान आणि लेखपट्टिका अशा संबंधित कागदपत्रांसह) जबाबदार असते. ती या सर्व व्यवहाराच्या चलानांचा डेटा पुढे आयकर विभागाकडे ऑनलाइन पारेषणासाठी तिच्या नागपूर येथील जोड कक्षाकडे पाठविण्यासाठी त्याचप्रमाणे जमा झालेली रक्कम भारतीय रिझर्व बँक (सेंट्रल अकाऊंटस सेक्शन), नागपूर यांच्याकडे जमा करण्यासहि जबाबदार असते.*

*__७.२__ नोडल शाखा दैनिक मेमो तयार करील आणि तो दैनिक तत्त्वावर तिच्या नागपूर येथील जोड कक्षाकडे पाठवील (एसबीआय, मुंबईच्या बाबतीत जीएडी) जो नंतर आरबीआय, सीएएस, नागपूर यांच्याबरोबर दैनिक तडजोड करील.*

*__७.३__ बँकांचे नागपूर येथील जोड कक्ष नोडल शाखेकडून प्राप्त झालेला चलान डेटा विभागाच्या टॅक्स इन्फर्मेशन नेटवर्ककडे (टीआयएन) पारेषित करण्यासाठी एकत्रित करील आणि दैनिक स्वीकृतीवर लक्षसुध्दा ठेवील आणि नोडल शाखांकडून प्राप्त झालेल्या दैनिक मेमोंच्या अचूकतेची तपासणी करील. त्यानंतर जोड कक्ष सीएएस, आरबीआय, नागपूर यांच्याकडे दैनिक मेमो पारेषित करील.*

*__७.४__ बँकांच्या नोडल शाखा त्यांनी त्यांच्या नागपूर येथील जोड कक्षाबरोबर तडजोड केलेल्या रकमेचा झेडएओबरोबर मासिक मेळ घालेल. झेडएओ त्यांच्या नोंदींच्या आधारे नोडल शाखांकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्रांची, मुख्य शीर्षक निहाय आणि नोडल बँक निहाय अशा दोन्ही प्रकारे पडताळणी करील. काही विसंगती असल्यास, नोडल शाखा त्वरित दुरुस्ती करील आणि झेडएओला माहितीच्या आधीन तिच्या जोड कक्षाद्वारे सीबीडीटीच्या खात्यात पूर्वीच जमा/वजा दाखविलेल्या रकमेतील फरक समायोजित करील.*

*__७.५__ झेडएओ आणि जोड कक्षांबरोबर अंतिम ताळमेळासाठी, सीएएस, नागपूर मासिक विवरणपत्र तयार करील आणि ते झेडएओ आणि बँकांच्या जोड कक्षाना पुरवील. आरबीआय, सीएएस, नागपूर पुढ्षील महिन्याच्या २० तारखेपर्यंत, मुख्य शीर्षकनिहाय स्वीकृत्या/परतावे वगैरे दर्शविणारे मासिक विश्लेषण सीसीए, सीबीडीटीला पुरवील.*

***८. जमा झालेल्या कराच्या प्रेषणाचा काळ आणि दंडात्मक व्याजाची आकारणी***

*८.१ अधिकृत बँकांच्या निर्धारित शाखांनी गोळा केलेले कर, तत्परतेने दैनिक तत्त्वावर सरकारी खात्यात जमा केले पाहिजेत. सीएएस, नागपूर येथील सरकारी खात्यात गोळा झालेले कर जमा करण्यासाठी दिवसांची कमाल संख्या खालील प्रमाणे आहे:-*

| *रीत* | ***सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा प्रेषण कालावधी*** | | ***खाजगी क्षेत्रातील बँकांचा प्रेषण कालावधी*** |
|---|---|---|---|
| ***प्रत्यक्ष*** | ***स्थानिक व्यवहार***<br>T+3 *कामकाजाचे दिवस*<br>(*पूट थ्रु डेटला वगळून*) | ***बाहेरगावचे व्यवहार***<br>T+5 *कामकाजाचे दिवस*<br>(*पूट थ्रु डेटला वगळून*) | T+3 *दिवस* (*पूट थ्रु डेट, रविवार आणि सुट्टिच्या दिवसाचा आंतर्भाव करुन*) |
| | ***दूरगामी स्थळे, अडथळे असलेल्या आणि डोंगराळ भागांसाठी***<br>T + 12 *कामकाजाचे दिवस* (*पूट थ्रु डेटला वगळून*) | | |
| ***ई-पेमेंट*** | (*पूट थ्रु डेटचा आंतर्भाव करुन*)<br>T + 1 *कामकाजाचा दिवस* | | T+1 *कामकाजाचे दिवस* (*पूट थ्रु डेटचा आंतर्भाव करुन*) |

*८.२ उक्त विहित कालावधीपेक्षा उशीर झाल्यास, उशीर झालेल्या कालवधीसाठी बँका व्याज लागू होण्यास पात्र असतील. उक्त नमूद केल्याप्रमाणे उशीरा वित्तप्रेषण केल्या बद्दल व्याज, झेडएओजनी राशी ठरवून कसूरदार बँकांकडून जमा करायचे आहे. अस्तित्वातील बँक दर (जो साधरणपणे दर दोन वर्षांनी मे १ आणि नोव्हेंबर १ रोजी अधिसूचीत केला जातो) अधिक २ % किंवा आरबीआयने वेळोवेळी सीजीए बरोबर सल्लामसलत करून ठरविल्याप्रमाणे व्याजाचा दर आकारावयाचा आहे.*

## ९. **"मार्च" व्यवहारांचा हिशोब करणे**

***९.१*** *रिझर्व बँक, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई, दर वर्षी फेब्रुवारी महिन्यात कर गोळा करणाऱ्या सर्व बँकांना मार्च महिन्याच्या व्यवहारांचा हिशोब करण्यासाठी स्वीकारण्याच्या कार्यपद्धतीबाबत विशेष सूचनांचे निर्गमन करील.*

***९.२*** *नोडल बँकांना चालू वर्षाच्या एप्रिल महिन्यात आधीच्या वर्षातील मार्चच्या संबंधातील लेखपट्टिका मिळतील. मार्च महिन्यातील सर्व जमा त्याच वर्षात हिशोबात धरण्यासाठी, नोडल बँकानी एप्रिल महिन्यात, खालील कार्यपद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.*

*नोडल बँकानी दोन स्वतंत्र लेखपट्टिकांचे संच तयार केले पाहिजेत-एक मार्च मधील अवशिष्ट जमा रकमेच्या संबंधात(करदात्याच्या खात्यातून मार्च ३१ पूर्वी वसूल झालेली प्रदाने) आणि दुसरी एप्रिल मधील व्यवहारांसाठी एप्रिलच्या पहिल्या १५ दिवसातील व्यवहारांची. त्यानी याची खात्री करून घ्यावी कि, स्वीकृती शाखांनी ३१ मार्चपर्यंत जमा केलेली सर्व कराची रक्कम "**मार्च अवशिष्ट**" म्हणून हिशोबात धरली आहे आणि आर्थिक वर्षात येणाऱ्या एप्रिल महिन्याच्या व्यवहारांशी सरमिसळ होणार नाहीत. १ एप्रिल ते १५ एप्रिल पर्यंतची मार्च महिन्यासाठी तयार केलेली मुख्य लेखपट्टिका ठळकपणे **"मार्च अवशिष्ट"** अशी चिन्हांकित करावी.*

***९.३*** *याचीहि नोंद घ्यावी कि, ३१ मार्च रोजी किंवा त्यापूर्वी वसूल झालेले धनादेश /रक्कम चालू आर्थिक वर्षातील व्यवहार समजण्यात यावेत आणि त्याप्रमाणे चालू वर्षात **"मार्च किंवा मार्च अवशिष्ट व्यवहार"** शीर्षकाखाली हिशोबात धरण्यात यावेत.*

***९.४*** *नोडल बँकानी त्यांच्या नागपूर येथील जोड कक्षाला कळविताना **मार्च अवशिष्ट** आणि **एप्रिल व्यवहार** असे वेगळे दाखविणारे आकड्यांचे दोन वेगळे संच १५ एप्रिलपर्यंत पाठवावेत.*

***९.५*** *तारीखवार मासिक विवरणपत्रेसुध्दा दोन संचात तयार करावीत, एक **मार्च अवशिष्ट** व्यवहारांचे आणि दुसरे **एप्रिलच्या व्यवहारांचे.***

## १०. **प्रत्येक वर्षी मार्चमध्ये विशेष व्यवस्था**

*शाखांनी, आधीच्या परिच्छेदात वर्णन केलेल्या कार्यपद्धतीचा काटेकोरपणे अवलंब करावा आणि प्रत्यक्ष करापोटी जमा केलेली रक्कम नोडल शाखा/जोड कक्षामार्फत तत्परतेने सरकारी खात्यात जमा करण्यासाठी पुढे पाठविली जाईल याची खात्री करावी. तथापि, प्रत्येक वर्षी मार्चच्या दुसऱ्या पंधरवड्यात, जेथे जेथे स्वीकृती शाखा आणि नोडल शाखा स्थानिक ठिकाणी स्थित आहेत, तेथे स्वीकृती शाखांनी, विशेष दूत पध्दतीचा आरंभ करावा. प्रत्येक वर्षी जून, सप्टेंबर आणि डिसेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात जमा रकमेचा आकडा दैनिक तत्त्वावर झेडएओकडे, सरकारकडे संनियंत्रणे, अंदाज करणे वगैरेसाठी पुढे पारेषित करण्यासाठी, पुरविण्यासाठी सर्व ते प्रयत्न करावेत.*

## ११. **संनियंत्रण समिती - नियतकालीन सभा घेणे**

*प्रत्यक्ष कर गोळा करण्याच्या आणि हिशोब करण्याच्या सुधारित योजनेचे काम अधिकृत बँकानी सुरळितपणे पार पाडावे यासाठी प्रत्येक झोनल अकाऊंटस ऑफिस केंद्रात नोडल बँक/बँकेचे स्थानिक आधिकारी, झेडएओ आणि आयकर विभाग यांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या संनियंत्रण समित्या स्थापन करण्यात येतील. समितीची दर सहामाहीला सभा होईल आणि हिशोब करण, लेखपट्टिका तयार करणे, अहवाल देणे, वित्तप्रेषण आणि मेळ घालणे वगैरे सारख्या प्रत्यक्ष करांशी संबंधित विषयांची चर्चा केली जाईल तिच्या पातळीवर समस्या सोडविण्याचा प्रयत्न करील. त्याशिवाय, वर्षातून एकदा संनियंत्रण समितीची विशेष सभा होईल, ज्यात सीबीडीटी, आरबीआय, आयकर विभाग आणि बँकांचे अत्यंत वरिष्ठ अधिकारी सहभागी होतील आणि बँका, झेडएओज आणि आयकर विभागाला क्षेत्रात सामोरे जाव्या लागणाऱ्या विविध समस्यांकडे लक्ष देतील. अशा सभेच्या कार्यवृत्तावर पाठपुरावा करणारी आवश्यक कारवाई केली गेली आहे याची बँकाकडून खात्री केली जाईल.*

### *१२. जनतेच्या तक्रारींचे निवारण*

*प्रत्येक अधिकृत बँकेची, सरकारी विभागाना किंवा सामान्य जनतेला सेवा देणाऱ्या शाखांमध्ये, जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी, वेळोवेळी विहित केल्यानुसार, प्रभावी कार्यपद्धती असली पाहिजे. कर प्रदानाच्या बाबतीत किंवा कर प्रदानाच्या मुख्य शीर्षकाबाबत बँकेला काही चूक आढळल्यास, एकतर स्वतःच आपल्या बाजूने किंवा करदात्यांने नजरेस आणून दिल्यानंतर, बँक तत्परतेने टीआयएनकडे एरर रेकॉर्ड पारेषित करील(यापूर्वी परिच्छेद २.६ आणि ७.४ मध्ये वर्णन केल्यानुसार). हे अनिवार्य आहे कारण आयकर विभाग बँकेने टीआयनकडे पारेषित केलेल्या माहितीवरच करदात्याची जमा असल्याचे दाखवीत असेल.*

.................

**जोडपत्र – २**

***ओल्टास (ओएलटीएएस)***
***फाईल सेग्रेगेशन युटिलिटी वापरण्याची पुस्तिका (एफ एस यू)***

***ओळख :***
*बँका, एफ एस यू वापरुन, अवैध इनपुट फाईल आणि संबंधित अशी चुकांची फाईल ह्यामधून एक वैध फाईल तयार करतील. ही पुस्तिका, बँकेतील एफएस्यू वापरणाऱ्यांना, त्यातील उपयोगी भाग समजण्यासाठी उपयोगी पडेल.*


***अपेक्षित वापर करणारे :***
*ही पुस्तिका ओल्टासमध्ये भाग घेणाऱ्या बँकांच्या लिंकसेल्ससाठी आहे.*

***वापरलेली कन्व्हेन्शन्स***
*प्रत्येक फील्ड किंवा बटणची पूर्ण माहिती प्रत्येक टास्क नंतर येणाऱ्या फील्ड वर्णन तालिकेत आहे*

***१. साधारण माहिती :***

*एफ एस यू ही चुकीची रेकॉर्ड बाजूला काढून ओल्टाससाठी वैध फाईल तयार करण्यास मदत करणारी युटिलिटी आहे. तुमच्याकडे ओल्टसफाईल व त्यासंबंधी चुकीच्या रेकॉर्डसची फाईल असली तरीही ती युटीलिटी, चुकीची रेकॉर्डस काढून नवी वैध फाईल बनवते. चुकीच्या रेकॉर्डसची फाईल वाचून ती अमान्य रेकॉर्डस काढते व फक्त वैध रेकॉर्डस असलेली आणि ऑटो – जनरेटेड आरटी ०४ रेकॉर्डस असलेली फाईलच तयार करते.ही वैध फाईल संकेतस्थळावर पाठवता येते. अमान्य रेकॉर्डस बाजूला घेऊन तुमच्या संदर्भात वेगळ्या फाईलमध्ये ठेवली जाते.*

***२. कार्यवाही***
*स्पेशल – एफव्हीयू. इएक्सई फाईल उघडल्यावर खालीलप्रमाणे एक युटीलिटी दिसते*





*आकृती १*

*युटिलिटीत प्रथम युटीलिटीचे नाव शिरोभागी येते युटीलिटी लहान व बंद करण्यासाठी बटणे, चार टेक्स्ट फील्डस आणि चार "ब्रॉऊझ बटणे", एक 'स्टार्ट' व एक 'कॅन्सल' बटण आहे. कॉपीराईट आणि आवृत्तीचा नंबर ही दिसतो. वापरणाऱ्याने खालील चारी टेक्स्ट फील्डसमध्ये वैध माहिती भरायची आहे.*

### (ए) इनपुट बेस फाईल

*बेस फाईलचा पूर्ण फाईल पाथ द्या. बेस फाईल म्हणजे जिच्यात चुकीची रेकॉर्डस असल्याने ती स्वीकारली गेली नाही ती फाईल, 'ब्राऊझ' बटण दाबून योग्य ठिकाणी जाऊन तुम्ही ही फाईल निवडू शकता. बटण दाबल्यावर तुम्हाला एक 'ओपन' चौकोन दिसेल. खाली दाखवल्या प्रमाणे (आकृती २) योग्य फोल्डरमध्ये जाऊन फाईल शोधून ती ऊघडा.*

*इनपुट फाईलचे नाव "डीडीएमएमवायवाय एफव्ही. बीएनके" याच फॉर्मटमध्ये असले पाहिजे.*





*आकृती २*

*फाईल एक्सटेंशनमध्ये वैध बँक कोड असले पाहिजे.*

### (बी) इनपुट एरर फाईल

*ही इनपुट बेस फाईलसंबंधीची एरर फाईल आहे. (पहिल्या स्टेपमध्ये निवडलेली) ओल्टास संकेतस्थळावरून ही एरर फाईल उतरुन घेऊन सेव्ह करता येईल. तुम्हाला ओल्टासच्या लिंकसेल युटिलिटीने बनवलेली एरर फाईल वापरता येईल. एरर फाईलचा पूर्ण पाथ देणे आवश्यक आहे. उजव्या बाजूला दिलेले 'ब्राऊझ' बटण वर दिल्या प्रमाणे वापरता येईल. ज्या फाईलमध्ये चुका आहेत, त्या फाईलचे नाव ह्या एरए फाईल मध्ये असते. हे नाव इनपुट बेस फाईलशी जुळले पाहिजे. यूजरने ही फाईल बदलायची नाही. जर योग्य एरर फाईल वापरली नाही तर खालील संदेश येईल व युटिलिटी बंद होईल :*

*इनपुट एरर फाईलचे नाव तपासले जात नाही.*




*आकृती ३*

***टीप :*** *वरील दोन्ही इनपुट फाईल्सपैकी एकही बदलेली गेली असेल तर वैध आऊटपुट फाईल तयार होणार नाही. एफ व्ही यू मधील किंवा ओल्टासच्या संकेतस्थळावरील एरर फाईल वापरली तरी चालेल. इतर कुठलेही फॉर्मट वापरु नयेत. कारण ते चुकीचे परिणाम देतील.*

***सी. आऊटपुट बेस फाईल***

*ही वैध आऊटपुट फाईल आहे. जी ओल्टास संकेतस्थळावर अपलोड होईल किंवा एफव्हीयूमधून तपासली जाईल. फाईलचा संपूर्ण पाथ विहित करावा लागेल. स्थळ लोकेशन वेगळे असल्यास, त्या फाईलचे नाव इनपुट बेस फाईल प्रमाणेच असेल. अन्यथा ती इनपुट बेस फाईलवर लिहिली जाईल(ओव्हर राईट). ब्राऊझ बटण वापरुन ती योग्य त्या फोल्डरमध्ये जा व तिथे ह्या फाईलचे नाव लिहा. आउटपुट बेस फाईल व इनपुट बेस फाईलचे एक्सटेंन्शन जुळले पाहिजे.*

*ए. फील्ड एमएजे –एचडी – सीडी –, टीओटी – एनओ – ओएफ –आरएफएनडी, टीओडी – एनओ – ओएफ – सीएचएलएन, टीओटी – एनओ – इआरआर –आरएफएनडी, टीओटी –एनओ - इआरआर – सीएचएलएन, आरएफएनडी – टीओटी – एएमटी, सीएचएलएन –टीओटी –एएमटी हे आकडे आरटी ०४ मध्ये वैध आऊटपुट फाईलमधील रेकॉर्डसवरून काढले जातात.*

*बी. एन – ओ – ओएफ –नोडल फील्ड आऊटपुट व्हॅलिड फाईलमधील रेकॉर्ड डाटावरुन काढले जातील : म्हणजे आऊटपुट व्हॅलिड फाईल मधील झेडएओ कोड्स*

*सी. प्रत्येक आरईओ ०४ ची पारेषण तारीख, आऊटपुट व्हॅलिड फाईल नेमच्या डीडीएमएमवायवाय भागा प्रमाणेच असेल.*

*डी. आरटीओ ०४ चे आरएफएनडी डेबिट – डीटी फील्ड रिकामे ठेवले जाते.*

*ई. विशिष्ट आरटी ०८ आर/ एन कॉंबिनेशनमध्ये, जर कुठल्याही रेकॉर्डमध्ये चूक असली तर दोन्ही रेकॉर्ड अमान्य केले जाऊन आऊटपुट एरर फाईलमध्ये नोंदवले जातील. आऊटपुट बेस फाईलचे नाव "डीडीएमएमवायवाय एफव्ही बीएनके" या स्वरुपात असले पाहिजे*

***डी. आऊटपुट एरर फाईल :***
*सर्व अमान्य रेकॉर्ड या फाईलमध्ये नोंदली जातील. वापरणाऱ्याने या फाईलचा संपूर्ण पाथ देणे आवश्यक आहे. या फाईलच्या नावाची पडताळणी होणार नाही.*

***स्टार्ट बटण :***
*वरील प्रमाणे चारही फील्डमध्ये वैध फाईलनेम्स लिहल्यावर स्टार्ट बटण दाबा. पूर्ण प्रक्रिया यशस्वी रितीने पार पडल्यावर एक संदेश दिसेल.*

***कॅन्सल बटण :*** *युटिलिटी थांबवण्यासाठी दाबा.*

*परिशिष्ट ३*

***नोडाल ब्रँच डेली मेन स्क्रोल (रिसीट्स) साठी फॉरमॅट :***

| | | |
|---|---|---|
| १ | नोडल ब्रँच स्क्रोल डेट (डीडी/ एमएम/वायवायवायवाय) | पहिली सहा फील्डस |
| २ | बीएसआर कोड | |
| ३ | डेट ऑफ रिसिव्हींग ब्रँच स्क्रोल (डीडी/ एमएम/वायवायवायवाय) | |
| ४ | टोटल टॅक्स अमाउंट | |
| ५ | टोटल नंबर ऑफ चलन्स | |
| ६ | डीओ - आयडी | |

| | | |
|---|---|---|
| # | प्रमुख शीर्ष (मेजर हेड) | ब्लॉक |
| # | रक्कम (अमाउंट) | |
| # | चलनाची संख्या (नंबर ऑफ चलन्स) | |

| | | |
|---|---|---|
| # | मेजर हेड | ब्लॉक |
| # | अमाउंट | |
| # | नंबर ऑफ चलन्स | |

| | |
|---|---|
| # | मेजर हेड |
| # | अमाउंट |
| # | नंबर ऑफ चलन्स |

:

:

:

***जितकी कर शार्षके असतील तितक्या वेळा वरील ब्लॉक प्रत्येक शीर्षासाठी एक लिहले जातील.***

***टीप :***

१. स्वीकार करणाऱ्या एका शाखेचे रेकॉर्ड एका ओळीत असले पाहिजे. आकडे कॉमाने वेगळे केलेले असावेत.

२. कॅरेज रिटर्न / लाइनफीड (म्हणजे 'एन्टर की' (↵) एका स्वीकृती शाखेच्या रेकॉर्डची अखेर दर्शविते .

३. चढत्या भाजणीने ब्लॉक असणे (एमएजेएचडी, एएमटी, एनओ – चलन ) बंधनकारक नाही, पण अपेक्षित आहे.

४. उदाहरण

पहिली सही फील्ड्स ब्लॉक ब्लॉक ब्लॉक

३०/११/२००५, ०२३०००१, २५/११/२००५, ६६००, २२, पीएनई ००२०, २००, २, ००२१, १००, १, ००२४, ३००, ४, ००२६, ४००, २, ००३१, ५००, १, ००३२, ६००, २, ००३३, ७००, १, ००३४, ८००, १, ००७०, ९००, १, ००३६, ११००, ५

उदाहरण (तपशीलवार)

पहिली सहा फील्ड्स ब्लॉक ब्लॉक ब्लॉक

१३/११/२००५, ००००४५५, १२/११/२००५, ५७७५, १८, पीएनई ००२०, १५२५, ६, ००२१, २००, २, ००२३, १००, १, ००२६, ३००, २, ००३१, ६००, १,

००३२, ७५०, २, ००३३, ५५०, १, ००३४, ८००, २, ००७०, ९५०, १ ↵
१३/११/२००५, ०००३८६१, १२/११/२००५, ९९५०, १७, पीएनई ००२०, ३५००, ५, ००२०, २२५०, ३, ००२३, ३००, १, ००२६, ४००, १, ००३१, ५००, १,

००३३, ६००, २, ००३२, ७००, १, ००३४, ८००, २, ००७०, ९००, १ ↵

१३/११/२००५, ०००४६१८, ११/११/२००५, ६४०११२, २२, पीएनई ००२०, ६२९३६७,२०, ००२१, १०७४५, २ ↵

१३/११/२००५, ०२३००११, ११/११/२००५, ४७००७१, २, पीएनई ००२०, ४७००७१, २ ↵
१३/११/२००५, ०२३०११६, १०/११/२००५, ३०४६४८, २०, एनएसके ००२०,२६९४२, २,००२१, २७७७०६, १८ ↵

१३/११/२००५, ०२३०००४, १३/११/२००५, ४०८१३४, १६, एनएसके ००२०, ४०७१९०, १५, ००२१, ९४४, १ ↵

५) नोडल बँक जर एकाच संकलक शाखेच्या दोन तारखांचे स्क्रोल एकाच डी आर एस मध्ये पाठवत असेल तर ही एन्ट्री डीआरएस फाईलमध्ये दोन वेगळ्या ओळींवर खालील प्रमाणे झाली पाहिजे.
१४/११/२००५, ०००२०५३, १२/११/२००५, ५७७५, १८, पीएनई ००२०, १५२५, ६, ००२१, २००, २, ००२३, १००, १, ००२६, ३००, २, ००३१, ६००, १,

००३२, ७५०, २, ००३३, ५५०, १, ००३४, ८००, २, ००७०, ९५०, १ ↵
१४/११/२००५, ०००२०५३, १३/११/२००५, ९९५०, १७, पीएनई ००२०, ५२५०, ६, ००२३, ५००, २, ००२४, ३००, १, ००२५, ४००, १, ००३१, ५००,

१, ००३३, ६००, २, ००३३, ७००, १, ००३४, ८००, २, ००७०, ९००, १ ↵

१४/११/२००५, ०००२०३४, १३/११/२००५, ४०८१३४, १६, एनएसके ००२०, ४०७१९०, १५, ००२१, ९४४, १ ↵

- वरील डी आर एस च्या पहिल्या दोन ओळींमध्ये दोन्ही ओळीत नोडल ब्रँच स्क्रोलडेट व बीएसआर कोड सारखेच आहेत, पण माहिती मात्र वेगळी आहे.

- संकलक शाखेची स्क्रोल डेट वेगळी पण नोडलब्रँच स्क्रोल डेट पेक्षा कमी असली पाहिजे.
- तिसरी ओळ त्याच नोडल बँकेच्या अन्य शाखेची आहे.

६. डेट — डीडी / एमएम / वायवायवायवाय फॉर्म मधली तारिख आहे

बीएस आरकोड : सात स्थानांचा न्यूमरिक कोड आहे

डीओ - आयडी : तीन स्थानांचे अल्फा कोड आहे

मेजर हेड : चार स्थानांचे न्यूमरिक कोड आहे.

अमाउंट व नंबर ऑफ चलन या संख्या आहेत.

..............................................................

## बँकांनी करदात्यांना द्यावयाच्या संगणकीकृत पावत्यांचा प्रारुप नमुना

| | |
|---|---|
| **संगणकीकृत पावती**<br>(चलान फॉर्म क्र.**२८१** बरोबर सरकारी खात्यात टीडीएस भरणा करताना कर गोळा करणाऱ्या बँकेने भरणा करणाऱ्याला द्यावयाची) | |
| कर गोळा करणाऱ्या बँकेचे नाव | |
| कर भरणाऱ्याचे (डिडक्टर) संपूर्ण नाव | |
| कर भरण्याचा टॅन ( **१०** अंक/अक्षरे ) | |
| भरणा केलेली रक्कम : | |
| (१) आयकर | |
| (२) अधिभार (सरचार्ज) | |
| (३) शिक्षण कर (सेस) | |
| (४) दंड | |
| जमा केलेली एकूण रक्कम : (अंकामध्ये ) | |
| कर भरण्याची रीत (रोख/खात्यातून वजा/चेक क्र. ..... ने | |
| चेक वटविला गेल्याची तारीख (दि/म/व) | |
| कंपन्यांकडून (**००२०**)/ कंपन्यासोडून अन्य ठिकाणाकडून (**००२१**) वजा केलेल्या आयकरामुळे | |
| उपशीर्षक (मायनर हेड) - प्रदानाचा प्रकार - (करदात्याने किंवा विभागाने कापलेला/गोळा केलेला टीडीएस/टीसीएस) | **२००/४००** |
| ज्यामधून कर कापण्यात किंवा गोळा करण्यात आला आहे त्या प्रदानाचा प्रकार - (विभागाचा संकेत (कोड) द्यावा) | |
| करनिर्धारण वर्ष (yyyy-yy) | |
| **चलान आयडेंटीफिकेशन नंबर (सीआयएन)** | |
| गोळा करणाऱ्या बँकेचा बीएसआर कोड ( **७** अंक ) | |
| चेक जमा केल्याची तारीख ( दिदि /मम /वर्ष) ( **८** अंक ) | |
| चलानचा अनुक्रमांक ( **५** अंक ) | |
| गोळा करणाऱ्या बँकेच्या शाखेच्या प्राधिकृत स्वाक्षरीकर्त्याची सही व शिक्का<br>↓ | |

## बँकेद्वारे करदात्यांना द्यावयाच्या संगणकीकृत पावत्यांचा प्रारुप नमुना

| | |
|---|---|
| ***संगणकीकृत पावती*** *(चलान फॉर्म क्र. २८० सोबत गोळा करणाऱ्या बँक शाखेने थेट कर भरणाऱ्याला सरकारी खात्यात टीडीएस भरतांना द्यावयाची)* | |
| *कर गोळा करणाऱ्या बँकेचे नाव* | |
| *कर भरणाऱ्याचे (डिडक्टर) संपूर्ण नाव* | |
| *कर भरण्याचा टॅन ( १० अंक/अक्षरे )* | |
| *भरणा केलेली रक्कम :* | |
| *(१) आयकर* | |
| *(२) अधिभार (सरचार्ज)* | |
| *(३) शिक्षण कर (सेस)* | |
| *(४) दंड* | |
| *जमा केलेली एकूण रक्कम : (अंकामध्ये )* | |
| *कर भरण्याची रीत (रोख/खात्यातून वजा/चेक क्र. ..... ने* | |
| *चेक वटविला गेल्याची तारीख (दि/म/व)* | |
| *कंपन्यांकडून (००२०)/ कंपन्यासोडून अन्य ठिकाणाकडून (००२१) वजा केलेल्या आयकरामुळे* | |
| *उपशीर्षक (मायनर हेड) - प्रदानाचा प्रकार* | |
| *करनिर्धारण वर्ष* (yyyy-yy) | |
| ***चलान आयडेंटिफिकेशन नंबर (सीआयएन)*** | |
| *गोळा करणाऱ्या बँकेचा बीएसआर कोड ( ७ अंक )* | |
| *चेक जमा केल्याची तारीख ( दिदि /मम /वर्ष) ( ८ अंक )* | |
| *चलानचा अनुक्रमांक ( ५ अंक )* | |
| ***गोळा करणाऱ्या बँकेच्या शाखेच्या प्राधिकृत स्वाक्षरीकर्त्याची सही व शिक्का*** ↓ | |

### *घरी बसूनही मी ऑनलाईन कर प्रदान कसे करु शकेन?*

*वर दिलेल्या बँकांमधील कोणत्याही बँकेत एक नेट बँकिंग अकाऊंट उघडा.*

१. incometaxindia.gov.in, *ह्या वेबसाईटवर जा व* 'pay taxes on-line' *वर क्लिक करा.*

२. *आवश्यक तो चलान ऑनलाईन भरा.* FAQ, download *इत्यादि च्या स्वरुपात स्क्रीनवर मदत उपलब्ध आहे.*

३. *नेट बँकिंगद्वाराच ऑनलाईन कर प्रदान करा.*

४. *स्क्रीनवर ताबडतोब सीआयएनसह (चलान आयडेंटिफेकेशन नंबर) चलानची काऊंटफॉईल उपलब्ध होईल. रिटर्न ऑफ इनकममध्ये ह्या काऊंटरफॉईलमधील सीआयएनचा संदर्भ द्यावा.*

५. *ही काऊंटरफॉईल प्रिंट करा व शक्य झाल्यास कॉम्प्युटरमध्ये सेव्ह करा.*

६. *तुमचे प्रदान आयकर विभागाला मिळाले आहे काय हे* https://tin.tin.nsdl.com/oltas/servlet/QueryTaxpayer *वर तपासून पहा.*

*********************

### *ऑनलाईन कर भरण्याचे फायदे काय आहेत?*

१. *तुम्ही तुमच्या नेट बँकिंग खात्यातून कोणत्याही ठिकाणाहून व कोणत्याही वेळी कर भरु शकता.*

२. *तुमच्या खात्यामधून निधी ताबडतोब हस्तांतरित केला जातो.*

३. *तुम्ही ई - चलानवर लिहिलेले थेट आयकर विभागाकडे पाठविले जाते. बँक कोणतीही डेटा एंट्री करणार नाही.*

४. *तुम्ही चलानची प्रत व पावतीची प्रत सेव्ह/प्रिंट करु शकता.*

५. *तुमच्या बँकेने रकमेचे प्रदान प्राधिकृत केल्यावर लगेच तुम्हाला स्वच्छ/स्पष्ट, वाचता येण्याजोगी पावती/काऊंटरफॉईल तुमच्या बँकेकडून मिळते.*

६. *ह्या ई - पेमेंट व्यवहाराचा ट्रँझॅक्शन आयडी तुम्हाला तुमच्या बँकेच्या विवरणपत्रात उपलब्ध होईल.*

७. *तुम्ही भरलेले पैसे आयकर विभागाला मिळाले की नाही हे तुम्ही ऑनलाईन तपासू शकता. ह्यासाठी तुम्हाला टॅक्स इन्फर्मेशन नेटवर्कच्या :*

https://tin.tin.nsdl.com/oltas/index.html

*ह्या वेबसाईटवर जाऊन* **CIN Based View** *ह्या बॉक्सवर क्लिक करावे लागेल.*

*अधिक माहितीसाठी कृपया* **PAY TAXES ONLINE**: *मधील* incometaxindia.gov.in *वर जावे.*

***महत्त्वाचे:*** *थकबाकीच्या मागणीबरोबर परताव्याचे समायोजन असल्यास, असलेला परतावा चलानबरोबर जोडावा व पूर्वीच्या रीतीप्रमाणे तो* AO *ने बँकेकडे पाठवावा.*

# महापरिपत्रक - सूचि

| अनु. क्र. | संदर्भ क्रमांक | विषय |
|---|---|---|
| १ | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-६८४/४२.०१.००१/ ०३-०४ दि. जानेवारी ९, २००४ | बदल : पिंकबुक प्रत्यक्ष करांची हिशेब प्रणाली |
| २ | आरबीआय/२००४/१३५ डीजीबीए. जीएडी. क्र. ११४२/ ४२.०१.००१/ २००३-०४ दि. २ एप्रिल २००४ | बँकेच्या शाखांत कर संकलन पध्दत – ग्राहकसेवा |
| ३ | आरबीआय/२००४/१३१ डीजीबीए. जीएडी. क्र. १००८/४२.०१.१३४/ दि. १ एप्रिल, २००४ | 'ओल्टास' ची ओळख सुरूवात – चलनांवर रबरी शिक्के मारणे |
| ४ | आरबीआय/१४५/२००४ डीजीबीए. जीएडी. क्र. १०६८/४२.०१.०३४/ २००३-०४ दि. १६ एप्रिल, २००४ | ऑनलाइन टॅक्स अकाउंटिंग सिस्टम (ओल्टास) साठी हिशेब पध्दती |
| ५ | आरबीआय/२००४/ १८४ डीजीबीए. जीएडी. क्र. १११४ / ४२.०१.०३४/ २००३-०४ दि. २९ एप्रिल, २००४ | ओल्टासचा वापर १ जून २००४ पासून चालू करणे |
| ६ | आरबीआय/२००४/ ७५ डीजीबीए. जीएडी. क्र.एच ६९ / ४२.०१.०३४/ २००४-०५ दि. २८ जुलै, २००४ | ऑनलाइन अकाउंटिंग सिस्टम (ओल्टास) एनएसडीएलला डाटा पाठवणे – पडताळणी |
| ७ | डीजीबीए. जीएडी. क्र. एच ८६४९/४२.०१.०३४/२००५-०६ दि. २३ डिसेंबर २००५ | ऑनलाइन अकाउंटिंग सिस्टम (ओल्टास) - बँकांमध्ये सॉफ्टवेअरची पडताळाणी |
| ८ | आरबीआय/२००६/ २९५ डीजीबीए. जीएडी. क्र. एच ११९४०/४२.०१.०३४/२००५-०६ दि. फेब्रुवारी २, २००६ | ऑनलाइन अकाउंटिंग सिस्टम (ओल्टास) –दैनंदिन स्क्रोल्स ईमेल ने झेडएओंकडे पाठविणे |
| ९ | आरबीआय/२००४/३२६ डीजीबीए. जीएडी. क्र. एच ३२७८-३३११/४२.०१.०३४/ २००४-०५ दि. डिसेंबर ३१, २००४ | सीबीडीटी ची थकबाकी गोळा करण्यासाठीच्या सब एजन्सी व्यवस्था काढून टाकणे |
| १० | आरबीआय/२००५/४६६ डीजीबीए. जीएडी. क्र. एच ५८०१/४२.०१.०३४/२००४-०५ दि. मे १३, २००५ | ऑनलाइन अकाउंटिंग सिस्टम (ओल्टास) -फंडस सेटलमेंट |
| ११ | आरबीआय/२००५/४०६ डीजीबीए. जीएडी. क्र. एच ५२३६/४२.०१.०३४/२००४-०५ दि. मार्च २९,२००५ | (ओल्टास) फंड्स सेटलमेंट आरबीआय, सी ए एस नागपूरला कळवणे. |
| १२ | आरबीआय/२००४/२१३ डीजीबीए. जीएडी. क्र. एच ११६९/४२.०१.०३४/ २००३-०४ दि. मे २२, २००४ | ऑनलाइन अकाउंटिंग सिस्टम (ओल्टास) साठी हिशेब पध्दती - स्पष्टीकरण |
| १३ | आरबीआय/२००४/१८१ डीजीबीए. जीएडी क्र. एच २३५/४२.०१.०३४/२००४-०५ दि. सप्टेंबर १५, २००४ | ऑनलाइन अकाउंटिंग सिस्टम (ओल्टास)- शाखांचा सहभाग |
| १४ | आरबीआय/२००४/१६४ डीजीबीए. जीएडी. क्र. एच १७०/४२.०१.०३४/२००३-०४ दि. सप्टेंबर ४, २००४ | बँकेकडून ओल्टासमधील डेटा कॅप्चर करण्यातील महत्त्वाचे प्रश्न |
| १५ | आरबीआय/२००५/४१२ डीजीबीए. जीएडी. क्र. एच ५३१८/४२.०१.०३४/२००४-०५ दि. एप्रिल ४, २००५ | करसंकलनासाठी बँकशाखांची मान्यता रद्द करणे |
| १६ | आरबीआय/२००५/८१ डीजीबीए. जीएडी. क्र. एच ३८२/४२.०१.०३४/२००५-०६ दि. जुलै २६, २००५ | ओल्टास - टॅक्स इन्फर्मेशन नेटवर्क (टिन) ने फाईल सेग्रेगेशन युटिलिटी बनविली. |
| १७ | आरबीआय/२००५/४११ डीजीबीए. जीएडी. क्र. एच - ५२८७/४२.०१.०३४/२००४-०५ दि. एप्रिल १, २००५ | ओल्टास : सीबीडीटी कलेक्शन सरकारच्या खात्यावर जमा करण्यासाठी हिशेब पध्दती |
| १८ | आरबीआय/२००६/१५० डीजीबीए. जीएडी. क्र. एच ६२२६/४२.०१.०११/२००६-०७ दि. ऑक्टोबर १०, २००६ | सरकारी महसूलाच्या वित्तप्रेषणासाठी अनुज्ञेय कालावधी |
| १९ | आरबीआय/२००७/२३५ डीजीबीए.जीएडी.क्र. एच-११७६३/४२.०१.०११/२००६-०७ दि. २४ जानेवारी, २००७ | सरकारी प्राप्तीच्या वित्तप्रेषणात विलंब- विलंब कालावधी व्याज |
| २० | आरबीआय/२००७/२८६ डीजीबीए.जीएडी.क्र.१३७४२/४२.०१.०११/२००६-०७ दि. १३ मार्च, २००७ | सरकारी प्राप्तीच्या वित्तप्रेषणात विलंब- विलंब कालावधी व्याज |
| २१ | डीजीबीए.जीएडी.क्र. एच-८२९४/४२.०१.०३७/२००५-०६ | ओल्टास - निर्धारितींचे चेकः -आदेशितीचे नाव |

| | | |
|---|---|---|
| | दि. १४ डिसेंबर २००५, | |
| २२ | आरबीआय/२००५/३९ डीजीबीए.जीएडी.क्र. एच-४२/४२.०१.०३४/२००५-०६<br>दि. ४ जुलै २००५ | वित्त अधिनियम २००५ - मुख्य शीर्षक व चलनामधील बदल |
| २३ | आरबीआय/२००६/५५ डीजीबीए.जीएडी.क्र. एच-१६१/४२.०१.०३४/२००५-०६<br>दि. ७ जुलै, २००६ | ओल्टास : पॅन / टॅनची पडताळणी |
| २४ | आरबीआय/२००४/३०० डीजीबीए. जीएडी. क्र एच २५३२-६५/४२.०१.०३४/२००४-<br>दि. १४ डिसेंबर, २००५ | पॅन व टॅन नंबर १/१/२००५ पासून चलनांवर लिहणे अनिवार्य |
| २५ | आरबीआय/२००५/२६५ डीजीबीए.जीएडी.क्र. एच-८८२४/४२.०१.०३४/२००५-०६<br>दि. डिसेंबर, २००५, २००५ | पॅन / टॅन लिहिणे अनिवार्य -राजस्थान राज्य |
| २६ | डीजीबीए. जीएडी. क्र. एच-३७७४/४२.०१.०३४/२००७-०८ ऑक्टोबर ९, २००७ | टीआयएन अपलोड केलेल्या चलानमधील माहितीतील त्रुटी/चुका |
| २७ | आरबीआय/२००७/२०६ डीजीबीए.जीएडी.क्र. ६२१२/४२.०१.०३४/२००७-०८ दि. डिसेंबर ६, २००७ | ऑनलाइन अकाउंटिंग सिस्टम (ओल्टास) - डेटाच्या दर्जा बद्दल |
| २८ | आरबीआय/२००८/३२८ डीजीबीए.जीएडी.क्र. एच-१२०७०/४२.०१.०३४/ २००७- ०८<br>दि. मे २२,२००८ | डेटाच्या दर्जामध्ये सुधारणा - जून १, २००८ पासून संगणकीकृत पावत्या देण्याची सुरुवात |
| २९ | आरबीआय/२००८/२७५<br>डीजीबीए.जीएडी.क्र.१०५७७/४२.०१.०३८/२००७-०८ दि. एप्रिल ३, २००८ | सरकारी राजस्वाबाबतच्या व्यवहारांच्या ई - पेमेंटसाठी कट - ऑफ कॉल |
| ३० | आरबीआय /२००८/२८०<br>डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१०८७५/४२.०१.०३८/२००७-०८ दि. एप्रिल १०, २००८ | ०१.०४.२००८ पासून विशिष्ट प्रकारच्या करदात्यांद्वारे ई - पेमेंटने वैधानिक कर प्रदान |
| ३१ | आरबीआय/२००८/३२१<br>डीजीबीए.जीएडी.क्र.एच-११८९५/४२.०१.०३८/२००७-०८ दि. मे १५, २००८ | आयटी अधिनियमाच्या कलम ४४एबी खाली येणाऱ्या कॉर्पोरेट व निर्धारणापात्र (ॲसेसी) द्वारा थेट करांचे वैधानिक ई - पेमेंट |
| ३२ | डीजीबीए.जीएडी.क्र. एच.५५१/४२.०१.०११/२००८-०९<br>दि. जुलै १८,२००८ | सरकारी व्यवहारांच्या ई - पेमेंटबाबत प्रेषणासाठी अनुज्ञेय कालावधी - खाजगी क्षेत्रातील बँका |
| ३३ | आरबीआय/२०१०-११/२२९ जीबीए.जीएडी.क्र. एच. २४४४/४२.०१.०११/२०१०- ११<br>दि. ऑक्टोबर, २०१० | सरकारी व्यवहारांच्या ई - पेमेंटबाबत प्रेषणासाठी अनुज्ञेय कालावधी - सार्वजनिक क्षेत्रातील बँका |
| ३४ | आरबीआय/२००९/४६३ डीजीबीए.जीएडी.क्र. ९२८४/४२.०१.०११/२००८-०९<br>दि. एप्रिल १८, २००९ | सरकारी खात्यात सरकारी भरण्याचे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे विलंबाने प्रेषण केल्यास व्याजाची वसुली |
| ३५ | आरबीआय/२००९-१०/३८१<br>डीजीबीए.जीएडी.क्र.एच-७७९०/४२.०१.०११/२००९-१० दि. एप्रिल ६ २०१० | दूरवरचे प्रदेश, दुर्गम व डोंगराळ प्रदेशांसाठी सरकारी खात्यात सरकारी राजस्व पाठविण्यासाठी परवानगी प्राप्त कालावधी |